**सुविचार**
अपने सहज स्वाभाविक स्वरूप में रहिए, यह कुछ और होने का स्वांग करने से कहीं अधिक अच्छा है।
(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र
दैनिक **यशवंत**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर
जि. लातूर
प्रवेश सूरू
2023-24
11 th, 12 th & Repeaters
NEET / IIT- JEE
संपर्क : 9423351370, 9890103190
अध्यक्ष : मल्लिकार्जूनअप्पा गदगेअप्पा मानकरी
सचिव : रामचंद्र पंढरीनाथ तिरूके

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. २७ फेब्रुवारी २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१०७ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# देशाला ग्लोबल हब बनविणार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज म्हणजेच २६ फेब्रुवारी रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित भारत टेक्स २०२४ चे उद्घाटन केले. दरम्यान, वस्त्रोद्योग क्षेत्राशी संबंधित जागतिक स्तरावर आजपर्यंतचा हा सर्वात मोठा कार्यक्रम आहे. २६ ते २९ फेब्रुवारी २०२४ दरम्यान भारत टेक्स २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ५ एफ व्हिजनपासून प्रेरणा घेऊन, या कार्यक्रमात फायबर, फॅब्रिक आणि फॅशनच्या माध्यमातून शेतीपासून ते परदेशापर्यंत एकात्मिक फोकस आहे. ज्यामध्ये संपूर्ण टेक्सटाईल व्हॅल्यू चेन समाविष्ट आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की आजचा कार्यक्रम खूप खास आहे, विशेषत: तो भारत मंडपम आणि यशोभूमी या भारतातील दोन सर्वांत मोठ्या प्रदर्शन केंद्रांमध्ये एकाच वेळी आयोजित केला जात आहे. आजचा कार्यक्रम हा केवळ टेक्सटाईल एक्स्पो नाही. या आयोजनाच्या एका धाग्याशी अनेक गोष्टी जोडल्या गेल्या आहेत. भारत टेक्सचे हे सूत्र भारताच्या गौरवशाली इतिहासाला आजच्या प्रतिभेशी जोडत आहे.

फॉर्म्युला तंत्रज्ञानासोबत विणकाम करणारा

भारत टेक्सचा हा फॉर्म्युला तंत्रज्ञानासोबत विणकाम करणारा आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच, भारत टेक्सचे हे सूत्र शैली, टिकाव, प्रमाण आणि कौशल्य एकत्र आणण्याचे सूत्र आहे. प्रत्येक १० वस्त्र निर्मात्यांपैकी ७ महिला आहेत आणि हातमागात ते त्याहूनही अधिक आहे. कापडाच्या व्यतिरिक्त खादीने आपल्या भारतातील महिलांना नवीन बळ दिले आहे असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले. **(पान ७ वर)**

## राम मंदिर दान १०० कोटी पार

अयोध्या : बालरुपातील रामलला दर्शन घेण्यासाठी अयोध्येत लाखोंच्या संख्येने भाविक येत आहेत. दररोज लाखो भक्त रामदर्शन घेत आहेत. तर दानधर्मही मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. आतापर्यंत सुमारे ६२ लाख भाविकांनी अयोध्येत येऊन रामदर्शन घेतल्याचे सांगितले जात आहे. यातच आता भाविकांना रामलला दर्शन अधिक सुलभतेने घेता यावे, यासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. यातच एका महिन्याच्या काळात राम मंदिरात सुमारे १०० कोटींचे दान भाविकांनी दिल्याची माहिती देण्यात आली आहे.

प्राणप्रतिष्ठेपासून दररोज सुमारे दोन ते अडीच लाख भाविक रामलला दर्शनासाठी येत असल्याचा श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचा अंदाज आहे. अयोध्येत **(पान ७ वर)**

# एआय जगासाठी सर्वांत मोठा धोका



नवी दिल्ली : डब्ल्यूआयटीटीच्या दुस-या पर्वामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स(एआय)वर चर्चा करण्यात आली. ग्लोबल समिटमध्ये एआय तज्ज्ञ म्हणून, रिलायन्स जिओचे मुख्य डेटा वैज्ञानिक डॉ. शैलेश कुमार, सॅमसंग एआय व्हिजनचे संचालक आलोक शुक्ला आणि स्टॅनफोर्ड विद्यापीठाचे प्रोफेसर अनुराग मैरल, चित्रपट निर्माता आणि टअफे चे मुख्य कार्यकारी अधिकारी जोनाथन ब्रॉन्फमन आणि मायक्रोसॉफ्टचे समिक रॉय यांनी त्यांचे विचार मांडले दिग्गजांनी एआय तंत्रज्ञान जग कसे बदलत आहे आणि त्यातील आव्हाने लक्षात घेऊन आपण त्याचा मानवतेच्या फायद्यासाठी कसा वापर करू शकतो हे सांगितले.

मायक्रोसॉफ्ट इंडियाचे कार्यकारी संचालक (कॉर्पोरेट, मध्यम आणि लघु व्यवसाय) म्हणाले की अक हे लोकांचे कौशल्य सुधारण्यासाठी आहे. जगात अनेक ॲप्लिकेशन्स आहेत, पण जेव्हा नोक-या निर्माण करण्याचा आणि प्रदान करण्याचा विचार येतो, तेव्हा आपण थोडे मागे जाऊ या, वीज, स्टीम इंजिन आणि संगणकाच्या सुरुवातीकडे या सर्वांनी जग बदलले आहे. या गोष्टी जगासाठी नवीन होत्या, पण त्यांनी लोकांना रोजगारही उपलब्ध करून दिला. भारतात संगणक आल्यावर देशात आयटी कंपन्या आल्या, ऑनलाइन व्यापार सुरू झाला, याचा अर्थ थेट नोक-यांमध्ये वाढ झाली. यावेळी आम्हाला एआयसह आमचे कौशल्य सुधारावे लागेल.

एआयमुळे नोक-या जाणार नाहीत, लोकांना फक्त एआय स्वीकारावे लागेल. उत्तर अमेरिकेतील करमणूक उद्योगात अक सामग्रीचे औपचारिकीकरण करण्याचे काम सुरू आहे. अक चा चुकीचा वापर म्हणजे काहीतरी चुकीच्या पद्धतीने दाखवणे. यामध्ये डीपफेक देखील येतो. पण हे सर्व असूनही, एआयचे बरेच चांगले उपयोग आहेत. प्रोफेसर अनुराग मैरल म्हणाले की, आरोग्य सेवा क्षेत्रात एआय आणल्यामुळे परिस्थिती सुधारली आहे. जगातील ५ अब्ज लोकांना चांगले उपचार मिळत नाहीत, तर भारतात आयुष्मान भारत योजना अधिक चांगले काम करत आहे. अशा परिस्थितीत, लोकांना स्थानिक आरोग्य सेवा **(पान ७ वर)**

# मराठवाड्यातील तीन जिल्ह्यात इंटरनेट बंद

जालना: मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरागे पाटील यांनी काल अंतरवाली सराटीत बैठकीदरम्यान उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. फडणवीस यांना माझा बळीच हवाय ना तर मी सागर बंगल्यावर येतो माझा बळी घ्या, असे म्हणत जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना झाले होते. मात्र, राज्य सरकारने अंबड तालुक्यात संचारबंदी लागू केल्यानंतर जरांगे पुन्हा अंतरवाली सराटीत दाखल झाले. यानंतर राज्य सरकारने पुढचे पाऊल टाकत छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात इंटरनेट बंद केले आहे.





जरांगे हे अंतरवली सराटी पासून दहा ते बारा किलोमीटर अंतरावर असलेल्या भांबेरी गावात रात्री मुक्कामाला होते. आज सकाळीच जरांगे यांचे तीन समर्थक शैलेंद्र पवार, बाळासाहेब इंगळे आणि शिवबा संघटनेचे श्रीराम कुरणकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात हे सहकारी सक्रीय आहेत. जरांगें यांनी मुंबईला जाण्याचा निर्धार केल्यानंतर हे तिघेही मुंबईला जाण्याच्या तयारीला लागली होते. यामुळेच आज २६ फेब्रुवारी सकाळी या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

जरांगे सगेसोयरेच्या मागणीवर ठाम

मनोज जरांगे आज मुंबईकडे निघणार होते. मात्र, राज्य सरकारच्यावतीने जालना जिल्हाधिका-यांच्या आदेशाने अंबड तालुक्यात संचारबंदी लागू करण्यात आली होती. यानंतर मनोज जरांगे यांनी पुन्हा अंतरवाली सराटीत जाण्याचा निर्णय घेतला. अंतरवाली सराटीत दाखल झाल्यानंतर मनोज जरांगे यांनी सगेसोयरेच्या अधिसूचनेवर ठाम राहणार असल्याचे म्हटले. संचारबंदी **(पान ७ वर)**

# जपानचे स्लिम मून पुन्हा ॲक्टिव्ह

टोकियो : गेल्या काही दिवसापूर्वी इस्त्रोच्या चंद्रयान ३ ने मोठी कामगीरी केली. या कामगीरीची जगभरात जोरदार चर्चा झाली होती. आता जपानच्या स्लिम मूनने मोठी कामगीरी केली आहे. सध्या चंद्रावर मोठी थंडी असते. या थंडीतही स्लिम ॲक्टिव्ह झाला आहे.



जपानी अंतराळ संस्थेशीही संपर्क प्रस्थापित केला आहे. जपानचा स्लिम लँडर १९ जानेवारी २०२४ रोजी चंद्रावर सर्वात अचूक लँडिंग करणारा जगातील पहिला प्रोब बनला. फक्त त्याला सरळ लँडिंग करता आले नाही. यानंतर जपानच्या शास्त्रज्ञांनी पुन्हा व्यवस्थित उभे केले होते. त्यानंतर त्याचे सोलर पॅनलही चार्ज झाले. याबाबत जपानी स्पेस एजन्सी जेएएक्सएने ट्विटर माहिती दिली आहे. यात म्हटले आहे की, आम्ही काल रात्री स्लिमला संदेश पाठवला आहे. तो त्यांनी स्वीकारला आणि प्रतिसादही दिला. म्हणजे आपले अंतराळ यान चंद्राच्या सर्वांत भयानक हिवाळ्यातील रात्री पुन्हा ॲक्टिव्ह झाला आहे. **(पान ७ वर)**



# फसवणूक नको आरक्षण द्या

मुंबई :-राज्यविधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे आजपासून सुरू झाले. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी कामकाज सुरू होण्यापूर्वीच विधिमंडळाच्या पाय-यांवर विरोधकांनी आंदोलन केले. आरक्षणाच्या मुद्यावरून विरोधक आक्रमक झाले.

फसवणूक नको आरक्षण द्या महायुती सरकारचा जागर, आरक्षणाचे रोज नवीन गाजरफ म्हणत सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.

यावेळी विरोधकांनी पाय-यांवर धिक्कार असो, मराठा समाजाच्या जीवाशी खेळणा-या सरकारचा धिक्कार असो, मराठा समाजाची फसवणूक करणा-या सरकारचा धिक्कार असो, मराठा - ओबीसींची फसवणूक करणा-या सरकारचा धिक्कार असो, अशा घोषणा देत सरकार विरोधात निदर्शने केली. **(पान ७ वर)**

# अहमदपूर उपविभाग निवडणूक पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा



लातूर, दि. २६ : आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत आज अहमदपूर तहसील कार्यालयात आढावा बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी अहमदपूर महसूल उपविभागात निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीचा आढावा घेतला.

प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत कदम, अहमदपूरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण फुलारी, तहसीलदार शिवाजी पालेपाड, नायब तहसीलदार पंकज मांदाडे यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रत्येक पात्र व्यक्तीचे मतदार यादीत नाव नोंदविणे आवश्यक असून नवीन मतदार नोंदणीला प्राधान्य द्यावे. तसेच मतदार यादीमध्ये असलेल्या दिव्यांग मतदार चिन्हांकित कराव्यात. जेणेकरून त्यांना मतदानासाठी घेवून येणे शक्य होईल. तसेच उपविभागात **(पान ७ वर)**

# ज्येष्ठ गायक पंकज उधास यांचे निधन

मुंबई : आपल्या आगळ्या वेगळ्या गायकीसाठी केवळ भारतच नाही तर जगभरामध्ये ज्यांची ख्याती होती अशा पंकज उधास यांच्या निधनाच्या बातमीने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतविश्वावर मोठी शोककळा पसरली आहे. आज सकाळी मुंबईतील ब्रीच कॅडी रुग्णालयात त्यांचे निधन झाल्याचे वृत्त समोर आले आहे.



बॉलीवूडमध्ये गेल्या चार दशकांहून अधिक काळ पंकज उधास यांनी आपल्या गायकीने वेगळी ओळख तयार केली होती. दीर्घ आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली असून त्यांच्या निधनानंतर बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटींनी पोस्ट करत त्यांना आदरांजली वाहिली आहे. ८० च्या दशकांत पंकज उधास यांनी त्यांच्या संगीत प्रवासाला सुरुवात केली होती. त्यानंतर तब्बल चार दशकांहून अधिक काळ ते संगीत विश्वात सक्रिय होते.



**श्रीमती डॉ. अर्चना पाटील आणि शैलेश पाटील यांची कन्या अधिवक्ता श्रीमती रुद्राली पाटील चाकूरकर यांच्या लग्नाच्या वेळी राजस्थान तिजारी फोर्ट अलवर येथे श्री शिवराज पाटील चाकूरकर, न्यायमूर्ती शिवराज पाटील, बसवराज जी पाटील, प्रदिप राठी, प्राध्यापक बी.व्ही.मोतीपवळे , शैलेश पाटील, राजेश्वर बुके, एन. बी. पाटील, केंद्रीय राज्यमंत्री श्री भगवंत खुब्बा, श्री गुलाम नबी आजाद हे देखील उपस्थित होते.**



**देशाचे माजी गृहमंत्री व राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. शंकररावजी चव्हाण साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज नांदेड येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी घेतलेल्या छायाचित्रात राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान खासदार श्री.अशोकराव चव्हाण, नांदेडचे खासदार श्री प्रतापराव पा. चिखलीकर, माजी आमदार श्री.अमरनाथ राजुरकर, नांदेडचे जिल्हाधिकारी श्री. अभिजीत राऊत, नांदेडचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.श्रीकृष्ण कोकाटे, नांदेड वाघाळा महापालिकेचे आयुक्त श्री. महेश डोईफोडे, श्री विनायकराव देशमुख, श्री. किशोर स्वामी आदी दिसत आहेत.**

# संवेदनशील मतदान केंद्रांची जिल्हाधिकारी यांनी केली पाहणी



लातूर, / प्रतिनिधी : शहरातील इंडिया नगर येथील एलआयसी कार्यालय इमारतीतील संवेदनशील मतदान केंद्रांची आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पाहणी केली. तसेच याठिकाणी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत कदम, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार पंकज मांदाडे यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

संवेदनशील केंद्रांवर लोकसभा सार्वत्रिक निवडणूक काळात मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार उपाययोजना कराव्यात. यामध्ये कोणत्याही प्रकारे कुचराई होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या.

लातूर उपविभागातील निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

लातूर महसूल उपविभागात आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीच्या आढावा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी घेतला. उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार पंकज मांदाडे यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार **(पान ७ वर)**



**आज स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त अंदमान निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये जाऊन त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करून त्यांच्या जेल समोरील पुतळ्यास ॲड. बळवंत जाधव वंदन केले.**

दैनिक
यशवंत
# अहमदपूर/चाकूर परिसर
मंगळवार दि.२७ फेब्रुवारी २०२४
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७


**संकल्प आणि कधीही न संपणारा संघर्ष म्हणजे जीवन**

# राष्ट्राच्या उभारणीत शिक्षक व विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची

## तालुकास्तरीय प्रशिक्षणात गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांचे प्रतिपादन




अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) राष्ट्राच्या उभारणीत शिक्षक व विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी तालुकास्तरीय प्रशिक्षणात गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांनी केले.

ते राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे , जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड आणि गटसाधन केंद्र अहमदपूर यांच्यावतीने सोमवारी दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता डॉ. एस. एस. एम. प्रतिष्ठान अंबाजोगाई रोड अहमदपूर येथे घेण्यात आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमता वृद्धी तालुकास्तरीय प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय स्थानावरुन बोलत होते.

यावेळी मंचावर प्रशिक्षण समन्वयक तथा राज्यस्तरीय सुलभक कामाक्षी पवार, विषय साधन व्यक्ती डॉ. बालाजी कारामुंगीकर, नितिन तुकाराम गडवे, गुंडरे एस.पी., वाघमारे बी.आर, विषय साधन व्यक्ती श्रीमती गुणाले मनिषा ,श्रीमती मंडलवार रत्नप्रभा, श्री केंद्रे सोमनाथ सर व चामे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना गटशिक्षणाधिकारी ढोकाडे म्हणाले की, राष्ट्राच्या उभारणीत शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची असून आजचा विद्यार्थी हा एकविसाव्या शतकातील आव्हानांना पेलणारा असला पाहिजे. तो जागतिक स्तरावरील स्पर्धेत टिकला पाहिजे आणि यासाठी शिक्षक हे प्रशिक्षित असणे काळाची गरज आहे काळानुसार शिक्षकांना स्वतःमध्ये बदल करून घ्यावा लागेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची वैशिष्ट्य ध्येयधोरणे, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, अंतर समवाय क्षेत्र,नाविन्यपूर्ण अध्यापन शास्त्र, २१ व्या शतकातील कौशल्य व भविष्यवेधी शिक्षण, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन, कुमार अवस्थेतील मुले समजून घेताना ,शाळा आधारित व क्षमता आधारित मूल्यांकन, राष्ट्रीय संपादनूक सर्वेक्षण, राज्य शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षण, कार्यक्षमता प्रतवारी दर्शके, कार्यपद्धती व विश्लेषण, कृती संशोधन कार्यपद्धती व कृती संशोधन व उपक्रम माहिती तंत्रज्ञानाचा शिक्षणातील उपयोग , प्रभावी शैक्षणिक नेतृत्व आदी घटका विषयी या प्रशिक्षणामध्ये सविस्तर अभ्यास होणो गरजेचे आहे. इयत्ता नववी ते बारावी च्या वर्गांना शिकवणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या तीन दिवशी प्रशिक्षणात नविन शैक्षणिक समजुन घेणे आवश्यक असल्याचेही ते शेवटी म्हणाले.

या तीन दिवसीय प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात जवळपास १९५ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे.

तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी सुलभक म्हणून डॉ. बालाजी कारामुंगीकर, भिमराव कदम, बाबासाहेब वाघमारे, टेकाळे आर.एस., उंदीरकले सर, जगताप वाय.एस, पांचाळ एस बी, सोमवंशी एस के , केंद्रे एस व्ही, घाटचेरले, पी.व्ही, गुंडरे एस पी, एन टी गडवे, जी.डी. गिरी, एस आर बुरगे आदिंचा समावेश आहे.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशिक्षण समन्वयक तथा राज्यस्तरीय सुलभक कामाक्षी पवार यांनी केले. सूत्रसंचालन सुलभक बाबासाहेब वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुलभक जी. डी. गिरी यांनी मानले.

# भारतीय जनता पार्टीच्या वतीने केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड यांचा अहमदपूर येथे सत्कार



अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) भारतीय जनता पार्टीच्या वतीने केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड यांचा अहमदपूर येथे सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, भारत सरकारचे केंद्रीय अर्थ व वित्त राज्यमंत्री ना. डॉ भागवतजी कराड यांचा भारतीय जनता पक्षाच्या वतीने अहमदपूर येथे ऱ्हदयपुर्वक सत्कार करण्यात आला.

अहमदपूर येथील डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज भक्तीस्थळावरील कार्यक्रम संपल्यानंतर केंद्रीय मंत्री भागवतजी कराड यांचा भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा अहमदपूर विधानसभा प्रमुख गणेश दादा हाके पाटील व भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. भारत भाऊ चामे यांच्या निवासस्थानी यथोचित सत्कार करण्यात आला.

केंद्रीय अर्थमंत्री डॉ. भागवतजी कराड यांच्या अहमदपूर येथील दौऱ्याच्या वेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, माजी आमदार बब्रूवान खंदाडे, माजी सभापती अशोक काका केंद्रे, जिल्हा सरचिटणीस ॲड. भारत भाऊ चामे, महीला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस रेखाताई तरडे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, जिल्हा चिटणीस हणमंत देवकते, प्रदेश सदस्य बालासाहेब होळकर, तालुका अध्यक्ष प्रताप पाटील, तालुका सरचिटणीस माणिक नरवटे,शहराध्यक्ष सुशांत गुणाले, माजी उपसभापती बालाजी गुट्टे, अमरदिप हाके,चंदशेखर डांगे, अजिंक्य चामे रामनाथ पलमटे, संतोष कोटलवार,संजय माने, परमेश्वर आढाव, संतोष कोटलवार,संजय माने, यांच्या सह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

Late laxmanrao Abarbande Multiple Education Society's

**ग्लोबल इंग्लिश स्कूल,अहमदपूर**

थोडगा रोड, अहमदपूर जि. लातूर पिन ४१३५१५

**पाहिजेत**

कै. लक्ष्मणराव अबरबंडे बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर व्दारा संचलित ग्लोबल इंग्लिश स्कूल, अहमदपूर जि, लातूर येथे इ. १ ली ते ८ वी सी.बी.एस.ई. पॅटर्न शाळेमध्ये खालील रिक्त जागा त्वरीत भरणे आहेत. तरी गरजुंनी खालील निर्देशित केलेल्या पत्यावर मुलाखतीस वेळेवर उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १. | प्राथमिक शिक्षक शिक्षीका-English, Math. | प्रत्येकी २ | बी.एस्सी. बी.एड./डी.एड. |
| २. | प्राथमिक शिक्षक शिक्षीका-Science, Social | प्रत्येकी २ | बी.एस्सी. बी.एड./डी.एड. |
| ३. | प्राथमिक शिक्षक शिक्षीका-Marathi, Hindi | प्रत्येकी २ | एम.ए. बी.एड./डी.एड. |
| ४. | Computer Teacher | प्रत्येकी २ | बी.एस्सी. कम्प्युटर, बी.एड./डी.एड. |
| ५. | माँटेसरी शिक्षीका-Nursary, LKG, UKG | प्रत्येकी ३ | एच.एस.सी./डी.एड. माँटेसरी |
| ६. | सेवक / सेविका | प्रत्येकी २ | १० वी पास / नापास |

१. अनुभवी व होतकरु उमेदवारास प्राधान्य व आकर्षक मानधन.
२. अर्ज स्वीकारण्याचा दिनांक व मुलाखत दि. ३ मार्च २०२४ रविवार सकाळी ठिक १०.०० वाजता.

Email- pethkareishwar@ gmail.com
ठिकाण : ग्लोबल इंग्लिश स्कूल, थोडगा रोड, अहमदपूर ता. अहमदपूर, जि. लातूर
संपर्क : 8805952128, 9422471488, 9385540094

वाचा : १. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ६१
२. मुंबई ग्रामपंचायत नोकराबाबत सेवेच्या शर्ती नियम १९६०
३. ग्रामपंचायत कार्यालय, वळसंगी मासिक सभा दि. २०/२/२०२४ ठराव क्र. ०४

**ग्रामपंचायत कार्यालय, वळसंगी**

ता. अहमदपूर जि. लातूर

**ग्रामपंचायत कर्मचारी भरती जाहिरात - जाहिर सुचना**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ६१ व उपरोक्त वाचा : २ व ३ अन्वये ग्रामपंचायत कार्यालय, वळसंगी, ता. अहमदपूर जि. लातूर यांच्याकडून ग्रामपंचायत शिपाई/ पाणी पुरवठा कर्मचारी एकुण १ पद. या पदासाठी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील पात्र उमेदवारांकडुन दिनांक २२/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ या कलावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

हे पद हंगामी असुन प्रथम ११ महिन्याची नेमणुक दिली जाईल त्यानंतर कामाचा आढावा घेवुन काम समाधानकारक असल्यास पुढील नेमणुक दिली जाईल. नेमणुक पुढे चालु ठेवणे अथवा रद्द करने हे ग्रामपंचायत ठरवील. अर्ज केलेल्या उमेदवारांतुन नियमानुसार पात्र उमेदवाराची निवड केली जाईल. आवश्यकता असल्यास उमेदवाराची लेखी परीक्षा, मुलाखत घेण्यात येईल. त्याबाबत

नोट : उमेदवार निवडीचे अधिकार व निवड झालेल्या उमेदवारास ग्रामपंचायत ने घातलेल्या नियम व अटीच्या अधीन राहणे बंधनकारक राहील.

सरपंच,
ग्रामपंचायत कार्यालय, वळसंगी,
ता. अहमदपूर जि. लातूर

ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, वळसंगी,
ता. अहमदपूर जि. लातूर

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, अहमदपूर यांचे कार्यालयात

जन्म-२/जन्म/मृत्यु विभाग

**जन्म नोंदनी प्रमाणपत्र जाहीरनामा**

जा.क्र २०२४/दंडनीय/कावि २००

विषय : जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणीचे आदेश होणे बाबत.

**जाहीरप्रगटन**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **पठाण जुबेर गफार** रा. काळेगाव रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदाराचा/मुलगा/मुलगी नाव अर्जदार **पठाण जुबेर गफार** यांचा जन्म दि. ०१/११/२००३ रोजी मौ. काळेगाव रोड, अहमदपूर ता. अहमदपूर येथे राहत्या घारी झाला असल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंदणी नगर परिषद कार्यालय, अहमदूपर, ता. अहमदपूर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म / मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये य्ग तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दि. २६/०२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

प्रत : १. नगर परिषद कार्यालय, अहमदूपर,ता. अहमदपूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे प्रगटन नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी. अहवाल मुदतीत प्राप्त न झाल्यास आपली काहीही हरकत नाही असे समजुन नियमानुसार पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल.

२. अर्जदार **पठाण जुबेर गफार** रा. काळेगाव रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरच्या जाहीर प्रगटनास दैनिक वृत्तपत्रामध्ये स्वखर्चाने प्रसिद्धी देवून वृत्तपत्र या कार्यालयास सादर करावे.

शिक्का

सही/-
तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार, अहमदपूर

# अहमदपूर येथील छत्रपती शाहू महाराज चौक येथे विनंती बस थांब्याची मागणी



अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) अहमदपूर येथील छत्रपती शाहू महाराज चौक येथे विनंती बस थांब्याची केली निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील छत्रपती शाहू महाराज चौक येथे विनंती बस थांबा करावा अशी मागणी कलापुष्प प्रतिष्ठान च्या वतीने निवेदनाद्वारे आगारप्रमुख यांना करण्यात आली.

या भागात व्यंकटेश नगर, सिद्धार्थ कॉलनी, कुमठा कॉलनी, विवेकानंद नगर साई कॉलनी, नंदनवन कॉलनी, अंबिका कॉलनी येथील शासकीय कर्मचारी, प्राध्यापक,शिक्षक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत व ते सकाळी कॉलेज, शाळा व नोकरीनिमित्त लातूर उदगीर यासह ग्रामीण भागात एस.टी.बस ने प्रवास करतात. सकाळच्या वेळेत त्याना शाळा,कॉलेज, ऑफीस वेळेत गाठणे आवश्यक असते मात्र काही अपवाद वगळता या ठिकाणी एस टी बस थांबत नाहीत म्हणून त्यांची गैरसोय होत होती.

या परीसरातील कर्मचारी वर्गाची ही खुप दिवसापासुनची मागणी होती.

आगार प्रमुखांनी लवकर हा प्रश्न मार्गी लावू असे यावेळी सांगितले.

या निवेदनावर कलापुष्प प्रतिष्ठान चे अध्यक्ष चंद्रशेखर भालेराव पत्रकार बालाजी पारेकर, बाबासाहेब कांबळे डी.जी.गायकवाड ॲड अमित गायकवाड गणेश पोलावार यांच्या स्वाक्षरी आहेत.

# भारतीय स्टेट बँकेच्या नविन दुसरी शाखा काढण्यासाठी केंद्रीय अर्थराज्यमंत्र्याकडे मागणी




अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) अहमदपूर येथे भारतीय स्टेट बँकेच्या नविन दुसरी शाखा काढण्या साठी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड कडे मागणी करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर शहराचा खुप विस्तार झाला आहे त्यामुळे येथे उद्योग हि वाढले आहेत पुर्वी स्टेट बँक ऑफ हैदराबाद व भारतीय स्टेट बँक असे दोन शाखा होते पण काही वर्षांपूर्वी याच विलीनीकरण झाल्यामुळे खातेदार व ग्राहक ची संख्या अधिक झाल्याने आणि कर्मचारी ची कमी असल्यामुळे बँकेत गर्दी होऊन खूप वेळ लागतो यामुळे ग्राहकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे म्हणून केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड यांना त्यांच्या जन्मगावी चिखली ता.अहमदपूर येथे दिनांक २५ फेब्रुवारी रोजी एका कार्यक्रमात भेट घेऊन अहमदपूर येथे भारतीय स्टेट बँकेच्या आणखी शाखा काढण्या साठी व कर्मचारी वाढविण्यासाठी निवेदन दिले. यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख. आ. बाबासाहेब पाटील यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका उपाध्यक्ष शेख अफ्रोज, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख शेख जिलानी, सेवादल शहराध्यक्ष मोहम्मद नाजीम व अहमद तांबोळी यांच्या स्वाक्षरी आहेत.

## कबीरवाणी

**देह धरे का दंड है**
**सब काहू को होय ।**
**ज्ञानी भुगते ज्ञान से**
**अज्ञानी भुगते रोय।।**

**भावार्थ** : संत कबीर म्हणतात कि, माणसाला जेंव्हा देह रुप प्राप्त होते तेंव्हा त्याला मानवी जन्माचे भोग भोगावेच लागणार आहेत. मात्र एके दिवशी प्रारब्ध निश्चित ठरलेला असतो. प्राप्त झालेल्या जीवनामध्ये जे काही आपल्या वाट्याला आले आहे ते भोगणे क्रमप्राप्त असते. समजुतदार माणूस या सत्याला स्वीराकरून जीवन जगत असतो. जे काही भोग, दुःखे आहेत, ती शांतपणे भोगतो. समाधानी राहण्याचा प्रयत्न करतो. मात्र, अज्ञानी माणसे उगीच आकाडतांडव करतात. नशीबाला दोष देत रडत राहतात. विनाकारण दुःख करत राहतात, म्हणुन जीवनामध्ये जे काही वाट्याला आले आहे ते भुगतेलच पाहिजे.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# यशवंत धाराशिव जिल्हा

मंगळवार दि. २७ फेब्रुवारी २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## मोकाट कुत्र्यांनी तीन विद्यार्थ्यांना घेतला चावा



भूम दि. २६ (प्रतिनिधी)– सध्या भूम शहरात मोकट कुत्र्यांच्या दहशतीने लहान मुले भयभीत झाले आहेत. गेल्या आठ दिवसात शहरात तीन विद्यार्थ्यांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतला आहे. भूम शहरात समर्थ नगर शिवाजीनगर, वीर गल्ली, आलम प्रभू रोड तसेच मुख्य रस्त्यावर भटक्या कुत्र्यांची संख्या ही कमालीची वाढल्याची दिसून येत आहे.

सकाळी व संध्याकाळी शहरातील बहुतांश विद्यार्थी शाळा व शिकवणी साठी या भागात येत असतात एकटा विद्यार्थी दिसताच हे भटके कुत्रे त्याच्या अंगावर धावून जाऊन त्याला चावतात. त्यामुळे विद्यार्थी व पालक दोघेही भयभीत झालेले आहेत. याबाबतीत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना वेळोवेळी नागरिकांनी निवेदन दिलेली असतानाही अद्यापही त्याच्यावर काही कारवाई न झाल्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

# शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन मोजणी अहवाल सादर करा

## शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

धाराशिव दि. २६ (प्रतिनिधी)–नळदुर्ग–अक्कलकोट राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादन प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने दिलेल्या निकालाचा अवमान होणार नाही याची काळजी घेऊन शेतकर्यांना विश्वासात घेऊन रीतसर मोजणी अहवाल सादर करुन शेतकर्यांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा पुन्हा न्यायालयात दाद मागणार असल्याचे निवेदन शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने सोमवारी (दि.२६) जिल्हाधिकार्यांना देण्यात आले.

शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष सरदारसिंग ठाकुर, न्यायालय प्रतिनिधी तथा समन्वयक दिलीप जोशी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी सचिन ओंम्बासे यांना सादर केले. निवेदनात म्हटले की, नळदुर्ग–अक्कलकोट राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादन प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठांमध्ये अवमान याचिका (क्र. १५९२०२३) सुनावनीदरम्यान दिलेल्या निर्देश व आदेशाप्रमाणे शेतकर्यांच्या उपस्थितीत मोजणी करून अहवाल मात्र शेतकर्यांना विश्वासात न घेता राष्ट्रीय महामार्गाच्या दबावाखाली केलेला अहवाल सादर करून न्यायालयाने दिलेल्या निर्देश व आदेशाचा अवमान करून शेतकर्यांवर अन्याय केला जात आहे. दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करून मोजणी अहवाल बाबत वेळकाढूपणा न करता मोजणी अहवाल न्यायालयात सादर करताना शेतकर्यांना विश्वासात घेऊन उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची काळजी घेऊन मोजणी अहवालामुळे शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, यासाठी शेतकर्यांना विश्वासात घेऊन मोजणी अहवाल सादर करणेबाबत संबंधित अधिकार्यांना आपल्या स्तरावर आदेश निर्गमित करून शेतकर्यांना न्याय मिळवून द्यावा.

न्यायालयात सुनावणीदरम्यान उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी डॉ. योगेश खरमाटे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी संग्राम जोगदंड हे प्रत्यक्ष उपस्थित होते. त्यावेळी जुना अस्तित्वातील रस्ता राष्ट्रीय महामार्ग अधिकारी व कोर्ट नियुक्त शेतकरी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत मोजणी प्रक्रिया करावी असे स्पष्ट निर्देश व आदेश दिले. त्याप्रमाणे तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग, वागदारी गुजनुर, शहापूर, निलेगाव, गुळहळ्ळी व इतर गाव शिवाराचे जुने अस्तित्वातील रस्त्याची मोजणी करून भूमापक भूमी अभिलेख तुळजापूर यांनी चार गावचे मोजणी अहवाल केले असल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी न्यायालयात सांगितले. परंतु या चारही गावचे अहवाल शेतकर्यांना विश्वासात न घेता तयार केलेले असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या दबावाखाली हे अहवाल तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने नळदुर्ग येथील २०२२ मध्ये करण्यात आलेल्या संयुक्त मोजणी अहवालात कोणताही बदल न करता व न्यायालयाने दिलेले निर्देश व आदेशाचे पालन न करता शेतकर्यांच्या स्वाक्षरीने पंचनामे न घेता त्याचा कोणताही उल्लेख अन्यथा रस्त्याची रुंदी बाबत केलेला नाही. यामध्ये शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर यांचे गट न व नाव यामधून वगळले आहे. याबाबत विचारणा केली असता तुळजापूरचे नूतन प्रभारी भूमी अभिलेख उपाध्यक्ष राजेंद्र मालाव यांना विचारले असता माझ्या सह्या घाई गडबडीत घेण्यात आल्या आणि मला या संदर्भात कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही असे सांगितले. यावरून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या दबावाखाली हे अहवाल सादर केलेला असून यात करण्यात आलेल्या चुका दुरुस्त करण्यात याव्या. तसेच नळदुर्ग मोजणी अहवालात जुना अस्तित्वातील रस्ता २० मीटरचा दाखवण्याचे आदेश भूमी अभिलेख जिल्हाधिक्षक धाराशिव यांनी दिले असल्याचे म्हटले आहे. त्याप्रमाणे झालेल्या चुका दुरुस्ती करुन मिळाव्यात, तसेच गुजनूर, निलेगाव, गुळहळ्ळी या गाव शिवारातील झालेल्या मोजणीवेळी आठ मीटरचा उल्लेख कुठेही नसताना तो अहवाल तक्ता तयार केला असून हा शेतकर्यांवर अन्याय व न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असून त्याची दुरुस्ती करण्यात यावी. तसेच शहापूर व वागदरी शिवारातील मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली असताना जाणीवपूर्वक वेळकाढूपणा करण्यार्या संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी. न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होऊन शेतकर्यांवर अन्याय होऊ नये यासाठी व बाधित शेतकऱ्यांना न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयि दिलीप जोशी, अध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, पदाधिकारी व्यंकट पाटील, महादेव बिराजदार, पंडित पाटील, अशोक पाटोळे, संतोष फडतरे, गुलाब शिंदे, राहुल डावरे, लक्ष्मण निकम, अजमुद्दीन शेख, बालाजी ठाकूर, महेश घोडके, नानासाहेब पाटील, खंडू हलकंबे, रहेमान शेख, प्रतापसिंग ठाकूर, बंडू मोरे, काशीनाथ काळे, सिराज पटेल, तोलू शेख यांची स्वाक्षरी आहे.

## भुम तालुक्यात जलरथाला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ

भुम दि. २६ (प्रतिनिधी)–ग्रामीण भागात लोकसहभागातून शाश्वत पाणीपुरवठा, गावातील पाण्याचे स्त्रोत शाश्वत स्वरूपात निर्माण करून बळकट करणे या उद्देशाने जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन टप्पा –२, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार व जलयुक्त शिवार या योजना विषयी ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्यासाठी राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून जल रथाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यासाठी भुम येथील जलरथास तहसीलदार जयवंत पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

भुम येथील तहसील कार्यालयात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जैन संघटनेचे ज्येष्ठ नेते शीतलभाई शहा तालुका अध्यक्ष सुनीलकुमार डुंगरवाल उपस्थित होते. ग्रामस्थांचा लोकसहभाग वाढवा यासाठी राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३५१ तालुक्यातील गावांमध्ये जल रथाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे त्या अनुषंगाने आज सकाळी जिल्ह्यातील ८ तालुक्यात जल रथांद्वारे प्रचार प्रसिद्धी करण्यात येणार आहे. या ८ रथांवर सनियंत्रणासाठी जिल्हा कक्षावर नोडल अधिकारी म्हणून जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक, तालुका पातळीवर गट विकास अधिकारी तसेच शासन नियुक्त प्रतिनिधी जिल्हा व तालुका पातळीवर रथाचे नियोजन करणार आहेत .

गावा– गावात जल रथाच्या माध्यमातून ऑडिओ जिंगल्स, गावात पोस्टर्स लावण्यात येणार आहेत. ग्रामस्थांना माहितीपत्रक दिले जाणार आहेत तसेच नियुक्त केलेल्या समन्वयका मार्फत योजनेची माहिती ग्रामस्थांना दिली जाणार आहे. गावातील जलस्त्रोत,



तलावातील गाळ काढण्याची मागणी सरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थांनी केली तर शासनाच्या पोर्टलवर मागणी तात्काळ ऑनलाईन करण्यात येईल. भारतीय जैन संघटना या कार्यासाठी तंत्रज्ञानाची मदत व डिमांड जनरेशनसाठी गावो गावी जाऊन शेतकरी बांधवापर्यंत पोहोचून जनजागृती करणार आहे. तरी या योजनेचा लाभ जास्तीत –जास्त शेतकऱ्यानी व ग्रामपंचायतीने घेवून तालुका दुष्काळ मुक्त करण्यासाठी तालुका अध्यक्ष सुनील कूमार डुंगरवाल यांनी आवाहन केले आहे.

## जिल्ह्यातील बाजार समित्या कडकडीत बंद

धाराशिव दि. २६ (प्रतिनिधी) – कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुका न घेता कायमस्वरुपी प्रशासकाची नेमणूक करण्याचा निर्णय मागे घेण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी (दि.२६) पुकारलेल्या बंद आंदोलनाला बाजार समित्या बंद ठेवून व्यापारी, शेतकरी, हमाल मापाडी बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला.

या आंदोलनात जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, उमरगा, मुरुम, लोहारा, परंडा, भूम, कळंब, वाशी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकार्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. केंद्र सरकारने बाजार समितीच्या धोरणात बदल करून निवडणुका न घेता कायमस्वपरूपी प्रशासकाची नेमणूक करून कारभार चालविण्याचा निर्णय हा देशातील शेतकर्यांच्या अधिकारावर गदा आणणारा असल्यामुळे केंद्र सरकारने तातडीने हा निर्णय मागे घ्यावा या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.खा. राजू शेट्टी



यांच्या नेतृत्त्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला व्यापारी, हमाल माथाडी कामगार, शेतकर्यांचा मोठा प्रतिसाद लाभल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी दिली.

## डॉ. राहुल घुले यांच्यावतीने मोफत मंगल सुविधा केंद्र




भूम दि. २६ (प्रतिनिधी)– भूमिपुत्र डॉ. राहुल भिमराव घुले यांच्या हस्ते आज दिनांक सोमवार रोजी शासकीय विश्रामगृह भूम येथे पत्रकार परिषद घेऊन भूम परांडा वाशी तालुक्यातील मुलींच्या लग्नासाठी मोफत मंगल सेवा सुविधा केंद्र सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.या सुविधेच्या माध्यमातून वधु–वरांना बसण्यासाठी आकर्षक खुर्ची (राजराणी खुर्ची) संच,लग्नातील पाहुण्यांना बसण्यासाठी खुर्च्या,जेवण बनवण्यासाठी लागणारी भांडी तसेच जेवण वाढण्यासाठी लागणारी भांडी,आसन पट्ट्या,चटई यासारख्या सुविधा कोणतेही भाडे न आकारता अगदी मोफत स्वरूपात देण्यात येणार आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त नागरीकांनी फायदा करावा असे आवाहन भूमिपुत्र डॉ. राहुल भिमराव घुले यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## बँक ऑफ इंडिया भूम शाखेची कर्ज देण्यास टाळाटाळ

भूम दि. २६ (प्रतिनिधी)– बँक ऑफ इंडिया भूम शाखेच्या व्यवस्थापकांची अरेरावी वाढली आहे. प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांनी देशातील गोरगरीब व सुशिक्षित बेरोजगार, महिला आत्मनिर्भर होण्यासाठी मोठी कर्ज योजना सुरू केल्या. मात्र या योजनेला हरताळ फासण्याचे काम राष्ट्रीयकृत बँका करत असल्याचे उदाहरण भूम शहरातील बँक ऑफ इंडिया करीत असल्याचे दिसून आले आहे.

भूम शहरात कुसुम नगर येथे बँक ऑफ इंडिया राष्ट्रीयकृत बँक आहे. या बँकेत भूम तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार व महिला यांनी स्वयंरोजगारासाठी पी. एम. इ. जी. पी.लोन योजना व सी. एम. इ. जी.पी. लोन योजना यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कडून कर्ज मिळावे यासाठी फाईल दाखल करण्यात आलेले आहे. पण या बँकेतील मॅनेजर कर्जदारकांना तुमची परिस्थिती कर्ज घेण्याची की नाही त्यामुळे दहा लाखाची फाईल मंजूर असतानाही तुमची परिस्थिती बघून आम्ही तुम्हाला दोन लाखापर्यंत कर्ज देऊ शकतो असे उत्तरे देत आहे.

त्यामुळे गोरगरिबांना जे झोपडीत राहतात त्यांना या बँकेतून कर्ज प्रकरणे घेणे अवघड झाले आहे. व्यक्तीची परिस्थिती बघून बँक लोन कधीपासून द्यायला लागली. प्रत्येक व्यक्तीचा सिबिल चांगला असेल तर त्याला बँक लोन देते पण बी वाय बँकेतील मॅनेजरने वेगळाच नियम लावलेला या बँकेत दिसत आहे. तसेच त्यांना याबाबतीत विचारणा केलेली असताना ते अरेराविची भाषा ग्राहकांना वापरत आहेत. तसेच माझ्या हातात आहे तुम्हाला काय करायचे करून घ्या अशा प्रकारच्या धमक्याही मॅनेजर कर्ज धारकांना देत आहे अशी कर्जदारकाची प्रतिक्रिया आहे. शाखा व्यवस्थापक यांनी मला लोन देण्याचा अधिकार आणि नाकारण्याचा अधिकार असल्याचा बोर्ड बँकेत लावलेला आहे तो दाखवला. असे मग्रूर अधिकारी बँकेत असतील तर सर्वसामान्य व गोरगरीब नागरिकांना कर्ज कसे उपलब्ध होणार याबाबत साशंकता आहे.ज्यांना स्वतःचा व्यवसाय उभा करायचा आहे असे कर्जदारक जाणून–बुजून वंचित ठेवण्याचे काम बीओआय बँकेच्या मॅनेजर कडून होताना दिसत आहे. त्यामुळे या बँकेत झालेल्या सर्व कर्ज प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे असे कर्जदारकांचे म्हणणे आहे. याबाबतीत राजकीय पक्ष व संघटनाही कर्जधारकांनी तक्रारी करूनही मूग गिळून गप्प बसलेल्या आहेत. त्यामुळे भूम तालुक्यातील कर्जदार आता कर्ज घेण्याच्या या कटकटीला कंटाळलेले आहेत.

## येरमाळा येथे शिवजन्मोत्सव उत्साहात विविध उपक्रमांनी साजरा

येरमाळा दि. २६ (प्रतिनिधी)– येरमाळा येथे दि.१८ फेब्रुवारी पासून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात व धुमधडाक्यात साजरा करण्यास सुरुवात करण्यात आली. सात दिवस चालणाऱ्या सार्वजनिक मध्यवर्ती शिवजयंती महोत्सव येरमाळा २०२४ यांच्या वतीने १८ फेब्रुवारी रोजी शिवरायांच्या स्वराज्यातील आठरा पगड जातीतील एक –एक प्रतिनीधी यांच्या हस्ते शिवरायांच्या मुर्तीची स्थापना करण्यात आली.

सोमवारी १९फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौरस्ता येरमाळा या ठिकाणाहून शिवरायांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी सात वाजता बाजार चौक येरमाळा येथे गावातील सर्व शाळांचा मिळून एकत्रित सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. शिवजयंतीनिमित्त येरमाळा गावात पहिल्यांदाच पाळणा महोत्सवाच आयोजन करण्यात आले होते.तसेच २१ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सवानिमित्त पोस्ट ऑफिस समोर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यात ९४ शिवभक्तांनी रक्तदान केले.

तसेच २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता रोकडोबा मंदिर छत्रपती मार्केट चौक या ठिकाणी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध युवा व्याख्याते श्री गणेश शिंदे सर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच गावातील विविध मान्यवरांचा आयोजकाकडून सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला व शिवजयंती महोत्सवानिमित्त श्री पत्रकार सुखदेव गायके व श्री पत्रकार कुंदन कांबळे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. तसेच गावातील सर्व शाळेमध्ये शिवजयंती महोत्सवानिमित्त



विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्या स्पर्धेतील बक्षीस वितरण हे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पुस्तके, महापुरुषांची पुस्तके, जन्द्रल नॉलेजची पुस्तके, शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.

२५ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजल्यापासून छत्रपती शिवरायांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आकर्षक सजावट, ढोल पथक व मुलींचे लेझीम पथक लक्ष वेधून घेत होते. आशा विविध उपक्रमाने, कार्यक्रमाने मध्यवर्ती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती यांच्याकडून मोठ्या उत्साहात आनंदात शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. या सर्व कार्यक्रमाला ज्ञानद्योग विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पौळ सर, जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिल बारकुल सर, जि प कन्या शाळेचे मुख्याध्यापक ठोंबरे सर, विद्यानिकेतन विद्यालयाचे सचिन पाटील सर, सरस्वती विद्यालयाचे माळवदकर मॅडम, यश मेडिकल फाउंडेशन चे संचालक डॉ संदीप तांबारे सर, मा सभापती विकास भाऊ बारकुल, जनहित पतसंस्थेचे संतोष तौर, उद्योजक समाधान बारकुल, उद्योजक धनंजय बारकुल, समाधान बेद्रे, बांगर अप्पा, सुनील पाटील सर, शरद बारकुल,राहुल पाटील व आदी उपस्थित होते.

शिवजन्मोत्सव यशस्वीरित्या उत्साहात पार पाडण्यासाठी देवानंद बारकुल, अमोल सर बारकुल, लहू बारकुल, बालाजी बारकुल, शशिकांत बारकुल, ओम शिंदे, शुभम बारकुल, सचिन पाटील, सुभाष बारकुल किरण बारकुल, गणेश पवार, प्रितेश बारकुल, विशाल बारकुल, संदीप ठोंबरे आदी जबाबदारीने प्रत्येक काम करत होते व सर्वांनी मेहनत घेतली.

## प्रा. डॉ. महेश मोटे यांचा साहित्यरत्न पुरस्काराने सन्मान



उमरगा, दि. २६ (प्रतिनिधी) – येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील राज्यशास्त्र पदवी–पदव्युत्तर व संशोधन केंद्राचे समन्वयक प्रोफेसर डॉ. महेश मोटे यांचा बेलाटी, ता. उत्तर सोलापूर येथे आयोजित पाचवे आदिवासी धनगर साहित्य संमेलनात रविवारी (ता. २५) रोजी सुप्रसिद्ध इतिहास संशोधक तथा अध्यक्ष डॉ. श्रीमंत कोकाटे, संमेलन अध्यक्ष तथा माजी आमदार अँड. रामहरी रुपनवर, संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. आर. एस. चोपडे यांच्या हस्ते साहित्यरत्न पुरस्कार प्रा. डॉ. महेश मोटे व सौ. मीरा मोटे यांना प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, शाल, फेटा बांधून व पुष्पहार घालून यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी सद्गुरु साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब कर्णवार पाटील, संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्रीराम पाटील, संस्थापक प्राचार्य डॉ. अभिमन्यू टकले, लातूर जिल्हा बँकेचे संचालक तथा उपाध्यक्ष संभाजीराव सुळ, लातूरचे उपायुक्त रामदास कोकरे, सोलापूर कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, करमाळा मार्केट कमिटीचे माजी सभापती प्रा. शिवाजी बंडगर, पत्रकार उज्वलकुमार माने, संयोजक सिद्धारूढ बेडगनूर, देवेंद्र मदने आदींची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या संशोधन व साहित्य क्षेत्रातील केलेल्या योगदानाबद्दल त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे विशेष अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

यशवंत धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. २७ फेब्रुवारी २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# सावरकरांचे पुरोगामित्व उच्च कोटीचे : प्राचार्य कुलकर्णी

देगलूर (प्रतिनिधी) : स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिश विरोधी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांनी आपल्या वैचारिक विश्वात धर्मग्रंथा ऐवजी विज्ञानग्रंथाला प्राधान्य दिलेले असल्यामुळे सावरकरांचे पुरोगामित्व हे उच्च कोटीतले होते, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात २६ फेब्रुवारी २४ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, उपप्राचार्य डॉ. प्रकाश कुकाले यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, विविध धर्मग्रंथातील कर्मकांडांचा पाया वाळूच्या ढिगावर उभारलेला आहे, त्यामुळे तथाकथित कर्मकांडा ऐवजी मानव जातीच्या कल्याणासाठी हितकारक असणाऱ्या धारणा व प्रथांचा अंगिकार केला पाहिजे, ही सावरकरांची भूमिका प्रखर विज्ञाननिष्ठ होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर पाटील यांनी केले तर आभार प्रा.राहुल चाकूरकर यांनी मानले.

# लोकसभेची पक्षाने जर संधी दिली तर दुग्ध प्रकल्प वर्षभरात उभारणार - मंगरुळे

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने मला संधी दिली तर शेतकरी व तरुणांसाठी गेमचेंजर ठरणारा दुग्ध प्रकल्प वर्षभरात उभारणार असल्याचे आश्वासन भारतीय जनता पार्टीचे माजी प्रदेश उपाध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी दि.२५ फेब्रुवारी रोजी दिले.

धाराशिव शहरातील एप्पल हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ऍड. खंडेराव चौरे उपस्थित होते. पुढे बोलताना मंगरुळे म्हणाले की, गेल्या दीड वर्षापासून आपण धाराशिव लोकसभा मतदारसंघातील गावे पिंजून काढली असून शेती, उद्योग व रोजगार या क्षेत्रात काम करण्याची मोठी गरज असल्याचे निदर्शनास आल्याचे त्यांना प्रकर्षाने जाणवले. त्यामुळे मला संधी मिळाल्यास येत्या वर्षभरात अमूल, सुमुलच्या धर्तीवर मोठा दुग्ध प्रकल्प उभारणार आहे. त्याद्वारेच शेतकरी व तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील आत्मनिर्भर भारत या उपक्रमाचा आधार घेत येथील बेरोजगार तरुणांना मालक बनविण्याचा आपला निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे यासाठी बनारस येथे असलेल्या मोठ्या दुग्ध प्रक्रिया उद्योगांची मदत घेऊन जिल्ह्यातही असा प्रकल्प उभा करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. बनारस येथील दुध प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे दररोज १ कोटी लिटर दुधावर प्रक्रिया केली जाते. त्याच्या १ रुपये उत्पन्नातील ८२ पैशांचा वाटा दुध उत्पादक शेतकर्यांना मिळतो. असाच उद्योग उभारून जिल्ह्यातील व्यावसायिक, मालक बनू शकतील असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील अनेक यशस्वी उद्योजक, कारखानदारांशी आपले सौहार्दपूर्ण संबंध असून त्यांच्या अनुभवाचा फायदा जिल्ह्यातील उद्योजक बनू इच्छिणार्या नवउद्योजकांना नक्कीच मिळवून देऊ असे आश्वासन त्यांनी दिले. आपल्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणार्या खिळ्यापासून ते बंदुकीच्या गोळ्या, रेल्वे व अन्य वाहनांचे पार्ट तसेच इतरही शेकडो वस्तू निर्मिती करणारा फोर्जिंग मशिनिंग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणण्याचा आपण निश्चय केला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या मतदारसंघातील माजी सैनिक व इतरही कुशल, अकुशल तरुणांना सोबत घेऊन सेवा क्षेत्रातील व्यवसाय उभा करणे व त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे



या लोकसभा मतदारसंघातील सर्वसामान्यांच्या जीवनात हा अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी येथील महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मदत व सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



# परंडा येथे शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

परंडा दि.२६ (प्रतिनिधी) – येथे सर्व धर्मीय व सकल मराठा परंडा तालुक्याच्यावतीने शिवजयंतीनिमित्त पारंपारिक शिवजयंती साजरी करण्यात आली. भव्य दिव्य अशी शेकडो हलक्या हत्ती घोडे राणी, वसा, दांड, पट्टे, सनई चौघडा आदी वाद्यांसह मिरवणुक काढण्यात आली. तर दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे यांच्या हस्ते करून मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिपचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, जिपचे सभापती नवनाथ आप्पा जगताप, शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख गौतम लटके, उद्योजक रामभाऊ पवार, माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर, पोलिस निरीक्षक विनोद इजेवार आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या शिव सप्ताहाचे विधानसभा अध्यक्ष मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन




धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शिव सप्ताह व आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे धाराशिव –कळंब विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष मोहन मुंडे यांच्या हस्ते शिवजयंती दिनी दि.१९ फेब्रुवारी रोजी करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरामध्ये शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे धाराशिव –कळंब विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष मोहन मुंडे यांच्या हस्ते धाराशिव शहरातील जिजाऊ चौकात राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील, धाराशिव शहराध्यक्ष सचिन तावडे, युवा जिल्हा कार्याध्यक्ष मनोज जगताप, सिने अभिनेता सचिन गवळी, धाराशिव शहर उपाध्यक्ष सतीश बारकुल, बापू करंजकर, सचिन करवर, पप्पू गरड, दत्ता जाधव, बालाजी जाधव, बालाजी सुरवसे, विक्की मुंडे, गणेश शेळके आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा सजविलेल्या ट्रॅक्टरमध्ये बसविण्यात आली होती. तर रॅलीमध्ये बाल शिवाजी हे मुख्य आकर्षण होते. तसेच वारकऱ्यांची दिंडी, सहभागी मावळे व बँड पथक सहभागी झाले होते. राजमाता बार्शी नाका येथील जिजाऊ चौक, लेडीज क्लब चौक, राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज चौकात गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाजत गाजत व फटाक्यांची आतषबाजी करीत ही रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच कळंब येथे मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले. यामध्ये तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांना मोफत औषधोपचार व चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तर भोजनदान करण्यात आले. तसेच ढोकी, येरमाळा, बावी, गोविंदपूर, चोराखळी, दहिफळ, वडगाव, तेर, तुगाव, भानसगाव, सोनेगाव, कौडगाव, आदींसह विविध ठिकाणी मुंडे यांनी शिव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

# गुणात्मक वाढ होण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे - पाटील

उमरगा दि.२६ (प्रतिनिधी) – शिक्षणात शहरी व ग्रामीण असा भेदभाव नसतो. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मात्र शाळेत संख्यात्मक वाढ होऊन चालणार नाही तर गुणात्मक वाढ होण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत माजी खासदार गोपाळराव पाटील यांनी दि.२४ फेब्रुवारी रोजी व्यक्त केले.



उमरगा तालुक्यातील कवठा दयानंद विद्यालयाचा ६५ वा वर्धापन दिन महोत्सव व गोपाळराव पाटील यांचा सत्कार समारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उस्मानाबाद जनता बँकेचे चेअरमन वसंतराव नागदे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सत्कारमूर्ती गोपाळराव पाटील, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी चेअरमन सुरेश बिराजदार, राज्य कंजूमर फेडरेशनचे माजी चेअरमन अशोक जगताप, मारुती महाराज साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सचिन पाटील, सास्तुर स्पर्श रुग्णालयाचे डॉ. रमाकांत जोशी, लातूर येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपसचिव सुनील सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव रमेश हेळंबे, श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील, ओमप्रकाश आर्य, संयोजक विजयकुमार सोनवणे आदी होते. प्रारंभी सत्कारमूर्ती डॉ गोपालराव पाटील, रमाकांत जोशी यांच्यासह प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, पूर्वीच्या व आताच्या काळात शिक्षणात मोठे बदल होत आहेत स्पर्धेत जो टिकला तोच जीवनात यशस्वी होत आहे शिक्षण हा जीवनाचा अविभाज्य घटक बनत असल्याचे त्यांनी सांगितले. तर प्रास्ताविकात विजयकुमार सोनवणे म्हणाले की, डॉ. गोपाळराव पाटील यांनी शिक्षणाचा लातूर पॅटर्न राज्यातच नव्हे तर देशात नावारूपाला आणले. त्यामुळे जुन्या पिढीला उभारी मिळावे यासाठी अशा शिक्षण प्रेमी व दानशूर यांचा सत्कार यावेळी होत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सुरेश बिराजदार, विनायकराव पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भरत सोनवणे, सचिव मधुकर सोनवणे, कोषाध्यक्ष सी. आर. मलंग, उमरगा बाजार समितीचे माजी सभापती नानाराव भोसले, गुंडाप्पा बिराजदार उपसरपंच विकास पाटील, प्राचार्य संग्राम मोरे, डॉ. सुरेश चव्हाण, गीतांजली पाटील – सोनवणे, शांताबाई पाटील, जगदीश पवार, सुरेंद्र पौळ, अमित सोनवणे, ऍड. युवराज माने, डॉ. रवींद्र सोनवणे, विठ्ठलराव पाटील, अमर सोनवणे, मुख्याध्यापक पी.के. कांबळे, सोसायटी चेअरमन संजय सोनवणे, व्हॉईस चेअरमन गुलाब भोसले, व्यंकट मडोळे, व्यंकटराव सोनवणे, शासकीय कंत्राटदार सुनील माने आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव ज्युनियर टॅलेंट सर्च विज्ञान प्रदर्शनास प्रतिसाद



धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – येथील भोसले हायस्कूलच्या प्रांगणात फ्लायिंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल आयोजित धाराशिव ज्युनियर टॅलेंट सर्च विज्ञान प्रदर्शन सोहळा दि.२५ फेब्रुवारी रोजी पार पडला.

धाराशिव शहरातील ग्रीन लँड, भोसले हायस्कूल, छत्रपती हायस्कूल, अभिनव हायस्कूल, तेरणा पब्लिक स्कूल, नूतन प्राथमिक विद्या मंदिर, फाउंडेशन, फ्लायिंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, मराठी कन्या प्रशाला आदी शाळांनी समावेश नोंदविला. तर ३०० विद्यार्थ्यांनी १६० प्रयोग सादर केले. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आदित्य पाटील व फ्लायिंग किड्स इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या संचालक डॉ. मंजुळा आदित्य पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भोसले हायस्कूलचे प्राचार्य साहेबराव देशमुख, तेरणा पब्लिक स्कूलच्या प्राचार्य जयश्री चौधरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमास परीक्षक म्हणून प्रा.संतोष देशमुख, आंबेवाडीकर, प्रकाश घुगे आदींसह विज्ञानप्रेमी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेत यशवंत कुंडकर, अविराज पाटील, समृद्धी देशमुख यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवले. तर उत्तेजनार्थ पारितोषिक वैष्णवी देवी दर्फळकर, अनुष्का देशमुख, वैभवी पवार, स्वरा शिंदे, मृण्मयी गोरे यांनी पटकाविले. या प्रदर्शनात चंद्रयान, पर्यावरण पूरक उपक्रम, सोलार एनर्जी उपक्रम आदी अद्यावत उपक्रमांचा समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कदम यांनी तर सूत्रसंचालन विज्ञान विभाग प्रमुख विनोद बडवे यांनी केले.

# जग झपाट्यात बदलत असताना त्या वेगाने निकोप स्पर्धा करण्याची गरज - आ. चौगुले



उमरगा दि.२६ (प्रतिनिधी) – महापुरुषांचा इतिहास वाचला पाहिजे व त्याचे अनुकरण केले पाहिजे. शिक्षण ही काळाची गरज असून देशातील युवकांना उच्च शिक्षित केल्याशिवाय आपण विकसित देशाची अपेक्षा करू शकत नाही. देशाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये युवकांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. जग झपाट्यात बदलत असताना आपणही त्या वेगाने त्याबरोबर निकोप स्पर्धा करण्याची गरज असल्याचे मत आमदार ज्ञानराज चौगुले यांनी दि.२४ फेब्रुवारी रोजी व्यक्त केले.

उमरगा येथे मायक्रोकॉम कंम्प्युटर एज्युकेशन व रोटरी क्लब उमरगा आयोजित तालुक्यातील शिवज्ञान स्पर्धतील यशस्वी विद्यार्थ्यांचा बक्षिस वितरण सोहळा पार पडला. त्यावेळी ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणुन रामकृष्ण बिराजदार, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनील साळुंखे, राष्ट्रवादी सोशल मीडिया जिल्हा प्रमुख समशोद्दीन जमादार, रोटरी क्लबचे अध्यक्ष कमलाकर भोसले, सचिव शिवकुमार दळवी, मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला, माजी नगरसेवक पंढरीनाथ कोने, मुख्याद्यापक पद्माकर मोरे आदी उपस्थित होते.

साळूंके यांनी यांनी तर्कशुद्ध, सर्जनशील आणि स्वतंत्र विचारांना विचारपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. शिक्षण पध्दती काळानुसार व त्या–त्या वेळेच्या सामाजिक बदलत्या संरचनेनुसार बदलत असून शैक्षणिक क्रांती घडविण्यासाठी ज्या महापुरुषांनी विशेष योगदान दिलेले आहे ते असामान्यच असल्याचे त्यांनी सांगितले. तर भोसले यांनी आपल्या देशात जगासोबत स्पर्धा करायची झाल्यास युवकांना सक्षम केले पाहीजे असे त्यांनी सांगितले. यावेळी रामकृष्ण बिराजदार, मनोज गुरव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी तालुक्यातील २२ शाळेतील २ हजार विद्यार्थ्यांची स्पर्धा घेण्यात आली. त्यातील प्रत्येक शाळेच्या प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. युसुफ मुल्ला यांनी तर सूत्रसंचालन स्नेहल जाधव व पुजा माने यांनी व आभार पुजा वाले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुमय्या जमादार, रमेजा मोमीन, मंजु माने, प्रदीप साळंके, इरफान मुल्ला, कार्तीक रजपुत यांनी परिश्रम घेतले. यावेळी तालुक्यातील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महात्मा गांधी विद्यालय डिग्गी, स्वामी विवेकानंद विद्यालय त्रिकोळी, जिजामाता माध्यमिक विद्यालय उमरगा, महात्मा गांधी विद्यालय उमरगा, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड, श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी, श्री भाऊसाहेब बिराजदार स्मारक विद्यालय येळी , श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय उमरगा, जिल्हा परिषद प्रशाला मुळज, कै शिवरामपंत चालुक्य कुन्हाळी, माधवी चालुक्य कन्या हायस्कूल उमरगा, ग्रामीण प्रशाला माडज, भारत विद्यालय बेडगा, श्री. ज्ञानेश्वर विद्यालय तुरोरी, लोकमान्य टिळक कदेर, भारत विद्यालय उमरगा, जिल्हा परिषद प्रशाला उमरगा, कै. शरणप्पा मलंग विद्यालय उमरगा, आदर्श विद्यालय उमरगा, ज्ञानप्रबोधिनी विद्यालय जेकेकुर व श्री शिवशक्ती विद्यालय एकूरगा.**

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, धाराशीव कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ९८०२२८२४०(अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही) संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# पोवाडे, शिवगीते, लावणी व लोकगीतांतून प्रबोधन

## 'दयानंद'च्या शिबिरात रंगला 'शौर्यगाथा शिवबांची' कार्यक्रम



**लातूर / प्रतिनिधी-** दयानंद कला महाविद्यालयाच्यावतीने तांदुळजा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर सुरू आहे. शिबिरात स्वयंसेवक व ग्रामस्थांसाठी शिवशाहीर प्रा. डॉ. संदिपान जगदाळे प्रस्तुत व दयानंद कला महाविद्यालय निर्मित 'शौर्यगाथा शिवबांची' हा प्रबोधनात्मक कार्यक्रम पार पडला. पोवाडे, शिवगीते, लावणी व लोकगीतांच्या सादरीकरणातून ग्रामस्थांचे मनोरंजनातून प्रबोधन करण्यात आले.

शाहीर डॉ. जगदाळे यांनी 'शिवजन्माचा पोवाडा' सादर करून शिवकालीन स्थिती व वर्तमान काळातील स्थितीची तुलना करीत प्रबोधन केले. आपल्या घरात शिवबा घडवायचा असेल तर मुलांना मर्दानी खेळ शिकवा व शिवबा दुसऱ्याच्या घरात व्हावा असे न म्हणता स्वतःच्या घरात शिवबा घडवण्यासाठी प्रत्येक महिलांनी जिजाऊ व्हावे, असेही आवाहन त्यांनी पोवाड्यातून केले.

यावेळी प्रा. विजय मस्के यांनी 'दोन राजे इथे जन्मले' या गीतातून छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या थोरवीचा महिमा गायला. स्वरांजली पांचाळ यांनी 'दैवत छत्रपती' हे शिवगीत सादर करून ग्रामस्थांची वाहवा मिळविली. राहुल भालेराव यांनी बोलक्या बाहुल्यांच्या कार्यक्रमातून मोबाइलसारख्या व्यसनाच्या आहारी न जाण्याचे युवकांना आवाहन केले. युवा शाहीर अधिराज जगदाळे यांनी 'म्हणून म्हणती शिवाजी माझा जाणता राजा' हे शिवगीत सादर करून महाराजांच्या कार्याची महती विशद केली.

सिनेतारका व कलर्स मराठी वरील 'ढोलकीच्या तालावर' या कार्यक्रमात लातूरचे नाव रोशन करणारी तनुजा शिंदे हिने 'पाडाला पिकलाय आंबा' ही लावणी विविध पदन्यास, भावमुद्रा व अभिनयाने रंगवत सादर केली व सर्वांची मने जिंकली. मनस्वी कांबळे हिने 'उंच माडीवरती चला' ही बैठीकीची लावणी सादर करून ग्रामस्थांना मंत्रमुग्ध केले. पश्चिम विभागीय युवक महोत्सवात सुवर्णपदक प्राप्त केलेल्या अर्जुन पवार यांनी नक्कल हा कलाप्रकार सादर करून श्रोत्यांचे मनोरंजन केले.

# प्रेरकांच्या थकीत मानधनासाठी उपोषणाचा इशारा



**उदगीर / प्रतिनिधी-** प्रौढ साक्षरता अभियान अंतर्गत काम केलेल्या प्रेरकांचे मानधन मिळावे यासाठी अनेकवेळा शासनाकडे पाठपुरावा करूनही अद्यापही मानधन मिळाले नाही. तत्काळ मानधन द्यावे अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा शिक्षण संचालकांना देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य साक्षर भारत प्रेरक संघटनेच्यावतीने २३ फेब्रुवारी रोजी निवेदन देण्यात आले. शिक्षणाधिकारी अनिता काळे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्यामार्फत शिक्षण संचालकांना निवेदन देण्यात आले. थकित मानधन तत्काळ द्यावे, नवभारत साक्षरता योजनेत सामावून घ्यावे, अंशकालीन दर्जा द्यावा, या मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. मागण्या मान्य नाही झाल्यास भगवान देशमुख, दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पुण्याच्या शिक्षण संचालक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भूजंग अर्जुने, जळकोट तालुकाध्यक्ष रामदास कदम, आकाश घोरपडे, देवणी तालुकाध्यक्ष लक्ष्मण रणदिवे, निलंगा तालुकाध्यक्ष सलीम बिरादार, जळकोट तालुका उपाध्यक्ष दशरथ वाघमारे, नागनाथ गायकवाड, सुनील पांढरे, धनराज देडे, प्रल्हाद गुबनर, महानंदा तादलापुरे, छाया गायकवाड, शोभा बिरादार, पद्मीन गायकवाड, त्रिशला कांबळे, कावेरी नितंगे, मंदा आदमाने, वैशाली शिंदे, काशीनाथ मुगे, माधव कांबळे, रवी गायकवाड आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांचे विचार व कार्य समाजाला प्रेरणादायी शिवव्याख्याते : प्रदिप ढगे




शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी: छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्व जातीधर्मातील लोकांना सोबत घेऊन रयतेच्या हितासाठी लोककल्याणकारी स्वराज्याची स्थापना केली.लोकहित डोळ्यांसमोर ठेवून राज्यकारभार करत आपल्या विचारांतून जगण्याची दिशा दिली.त्यामुळे शिवरायांचे विचार व कार्य आजही समाजाला, देशाला प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रदिप ढगे यांनी केले.

उजेड येथील शिवजन्मोत्सव निमित्त रसुलसाब म.देशमुख बहु. सेवाभावी संस्था हिसामाबाद यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रतिनिधी अनंत जाधव हे होते.तर या प्रसंगी पोलिस निरिक्षक विठ्ठलराव दराडे,माजी जि.प.सदस्य ऋषीकेश बद्दे, अॅड. एस.एम.कांबळे, मल्लिकार्जुन धनासुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

छत्रपती शिवाजी महाराजांची लढाई कुणा धर्माविरुद्ध नसून ती स्वराज्यासाठी होती.शिवाजी महाराजांचे कार्य सर्वधर्मीयासाठी दिशादर्शक असल्याने त्यांची जयंती आज मुस्लीम समाजदेखील साजरी करत असल्याचे ही व्याख्याते प्रदिप ढगे यांनी सांगितले.प्रारंभी बार असोसिएशन उपाध्यक्षपदी निवडीबद्दल अॅड. एस.एम.कांबळे यांचा तर आदर्श पालक म्हणून पी. एस.कदम यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आजची समाज व्यवस्था व विचारांवर प्रास्ताविकातून शरदकुमार रेड्डी यांनी प्रकाश टाकला.संयोजक पत्रकार शकील देशमुख व जेष्ठ नेते ऋषीकेश बद्दे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन पी.एस.कदम यांनी तर आभार संजय बिराजदार यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रकाश जाधव,व्यंकट डांगे,दयानंद चिमणशेट्टे,मौलाभाई शेख ,व्यंकट मरडे,पप्पु सोमवंशी,पंकज जाधव आदींनी परिश्रम घेतले.यावेळी तीन ही शाळेचे विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वशांती बुद्ध विहारात ८० वी काव्यपौर्णिमा उत्साहात



नांदेड - येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित साहित्य मंडळाची ८० वी काव्यपौर्णिमा जवळा देशमुख येथील विश्वशांती बुद्ध विहारात उत्साहात साजरी झाली. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, ज्येष्ठ कवी थोरात

बंधू, विनोद गोडबोले, भैय्यासाहेब गोडबोले, सुभाष लोखंडे आदींची उपस्थिती होती.

माघ पौर्णिमेनिमित्त जवळा दे. येथे पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात काव्यपौर्णिमा कार्यक्रमासाठी येथील सप्तरंगी साहित्य मंडळाला पाचारण करण्यात आले होते. मुख्य समारंभासाठी न्यायाधीश तथा जिल्हा विधीसेवा प्राधिकरणच्या सचिव दलजीत कौर जज, ज्येष्ठ विधिज्ञ विजय गोणारकर, बार्टीच्या जिल्हा प्रकल्प अधिकारी सुजाता पोहरे, लोहा समतादूत ज्योती जाधव, सोनखेड पोलिस स्टेशनच्या पोलिस उपनिरीक्षक वैशाली कांबळे, राघोजी कोकरे, राज गोडबोले रमेश कोकरे, आयोजक रमेश गोडबोले, कैलास गोडबोले, आनंदा गोडबोले आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाई यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्रिसरण पंचशील आणि त्रिरत्न वंदना घेण्यात आली. काव्यपौर्णिमा कार्यक्रमात अनुरत्न वाघमारे, नागोराव डोंगरे, प्रज्ञाधर ढवळे, थोरात बंधू, विनोद गोडबोले यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद गोडबोले व राज गोडबोले यांनी केले. आभार प्रदर्शन विनोद गोडबोले यांनी केले. कार्यक्रमास उपासकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रुकमीनबाई गोडबोले, पांडूरंग गोडबोले, गिरजाबाई गोडबोले, रावण गोडबोले, सुंदरबाई गोडबोले, पुरभाजी गोडबोले, वैशाली गोडबोले, रमेश गोडबोले, संगिता गोडबोले, कैलास गोडबोले, मिनाक्षी गोडबोले, विलास गोडबोले, आकांक्षा गोडबोले, आनंद गोडबोले, प्रियंका गोडबोले, मिलिंद गोडबोले, छाया गोडबोले, विनोद गोडबोले, विद्या गोडबोले, वैभव गोडबोले, शितल गोडबोले, विशाल गोडबोले, सुरज गोडबोले, सुमेध गोडबोले, सत्यजित गोडबोले, पंकज नवघडे, रोहित नवरे यांनी परिश्रम घेतले.

# चाकूर शहरासाठी ७५.६५ कोटी रूपयाच्या पाणीपुरवठा योजनेला मंजूरी



चाकूर : चाकूर शहरासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ७५.६५ कोटी रूपयाच्या पाणीपुरवठा योजनाला मंजूरी मिळाली असून या योजनेमुळे शहरातील प्रत्येक कुटुंबाला २४ तास मुबलक पाणी उपलब्ध होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष कपील माकणे यांनी दिली आहे.

चाकूर शहराला बोथी तलावावरून पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत आहे, ही योजना कालबाह्य झाली असून वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नविन पाणीपुरवठा योजना मंजूर करणे गरजेचे होते. यासाठी नगराध्यक्ष कपील माकणे यांनी दोन वर्षाच्या कालावधीत योजनेचे सर्वेक्षण, पाणी आरक्षण, तांत्रीक मान्यता, प्रशासकीय मान्यता ही कामे तातडीने करून घेतली.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीची प्रशासकीय मंजुरी संदर्भातील बैठक शुक्रवारी (ता.२३) मुंबई येथे पार पडली. या बैठकीत चाकूर शहरातील पाणीपुरवठा योजनेला राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिली आहे. प्रशासकीय मंजुरीचे आदेश लवकरच निर्गमित होणार आहेत.

घरणी प्रकल्पातून शहराला पाणीपुरवठा होणार असून यासाठी ७५.६५ कोटी रूपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार, प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चुभाऊ कडू, माजी पालकमंत्री आमदार संभाजीराव पाटील, आमदार बाबासाहेब पाटील यांनी सहकार्य केल्यामुळे ही योजना तातडीने मंजूर झाली असल्यामुळे नगराध्यक्ष कपील माकणे यांनी त्यांचे आभार मानले आहे.

# येरोळ येथे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने जनजागृती




शिरूरआनंतपाळ : येरोळ येथील गांधी चौकामध्ये जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने जीवन सामाजिक विकास प्रतिष्ठान डिगोळ या संस्थेच्या कलापथकाने महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजना सन २०२३ / २४ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती लोककलेच्या माध्यमातून दिली.

त्यामध्ये भारत सरकार शिष्यवृत्ती योजना, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे, रमाई आवास योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना अशा विविध विषयावर पथनाट्याद्वारे जनजागृती शाहीर लक्ष्मण बनसोडे, संजीव लाडके, पंकज बनसोडे, रमाकांत पाचंगे, सत्यवान मदने, शितल सूर्यवंशी, राहुल कांबळे, खंडेराव बोयणे, द्रोपदी सूर्यवंशी यांनी केली. या कार्यक्रमासाठी गावातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नागरिक यांच्यासह सर्व जाती जमातीचे ग्रामस्थ उपस्थित होते.

# तळेगाव (दे) येथे शिवनेरी महाविद्यालयचे रासेयो शिबीराचे आज उदघाटन

शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी- येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने तालुक्यातील तळेगाव (दे ) येथे दि . २५फेब्रुवारी ते २ मार्च २०२४ दरम्यान म युवकांचा ध्यास : ग्राम शहर विकास म हा उद्देश ठेवून शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे .या शिबीराचे उदघाटन दि २६ फेबुवारी रोजी तळेगाव ( दे ) येथे गट विकास अधिकारी बी . टी . चव्हाण यांच्या हस्ते करण्यात येणार आहे .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष प्रतापराव माने राहणार असुन, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून औसा येथील कुमार स्वामी महाविद्यालयाचे माजी समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा . डॉ वैजनाथ मलशेटे, संस्था सचिव पदमाकर मोगरगे, संस्था कोषाध्यक्ष जयेश माने , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरुण धालगडे, यांच्या सह गावच्या सरपंच सौ.कांताबाई दत्तात्र्य कांबळे ,उपसरपंच जगदीश सुर्यवंशी, ग्रामसेवीका सौ कदम पी . पी ., सेवा सोसायटीचे चेअरमन अनंत शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष संजीव सुर्यवंशी , शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिदास सुर्यवंशी ,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विरेंद्र उस्तुरगे , ग्रा पंचायत सदस्य पंडीतराव शिंदे , पंडीतराव लवटे यांच्या उपस्थीतीत हा कार्यक्रम होणार आहे .

या सात दिवसाच्या रासेयो शिबीरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . यात प्रामुख्याने अंधश्रद्धा निर्मूलन ,बेटी बचाओ बेटी पढाओ , बाल विवाह रोखण्यासाठी धम्मपाल सावंत यांच्या कलामंचातर्फे प्रबोधनात्मक कार्यक्रम , बचत गट महिलांना कुटीर उधोग करण्या संदर्भात मार्गदर्शन, व्यसनमुक्ती संदर्भात प्रबोधनात्मक, वृक्ष लागवढ , पाणी अडवा पाणी जिरवा, सेंद्रीय शेती काळाची गरज व्याख्यान ,आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीराचे आयोजन, रक्त तपासणी, पशु आरोग्य तपासणी , ग्राम स्वच्छेता अशा विविध विषयावर मार्गदर्शन व काम करण्यात येणार आहे अशी माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा . डॉ पांडूरंग मुट्ठे प्रा . डॉ . अमोल इंगळे यांनी माहिती दिली.

# जगाच्या ट्रेड पेक्षा मनाचा ट्रेंड ओळखून करिअर निवडावे - डॉ. संदीपान जगदाळे

## श्री विजयकुमार स्वामी ग्रामविकास प्रतिष्ठानच्या वतीने करिअर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**लातूर / प्रतिनिधी-** आपण ग्रामीण भागातले आहोत असा न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने करिअरची निवड करावी. करियर निवडत असताना मिळालेले गुण, मित्राने कोणती शाखा निवडली, आई-वडिलांच्या अपेक्षांची ओझे आणि जगाच्या ट्रेड पेक्षा मनाचा ट्रेंड ओळखावा व आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घ्यावा असे प्रतिपादन समुपदेशक डॉ संदिपान जगदाळे यांनी केले. ते श्री अखंडेश्वर बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित श्री विजयकुमार स्वामी ग्रामविकास प्रतिष्ठान तांबाळा तालुका निलंगा यांच्या वतीने आयोजित शिक्षणाच्या वाटा भविष्याच्या दिशा या कार्यक्रमात बोलत होते.

दोन तासात चाललेले या कार्यक्रमात डॉ. जगदाळे पुढे म्हणाले की, करिअर म्हणजे केवळ पैसा प्राप्त करणे असे नव्हे तर निवडलेल्या करिअरला आपण काय योगदान देणार आहोत हे महत्त्वाचे आहे. करिअर निवडण्यापूर्वी शंभर वेळा विचार करा परंतु एकदा करिअर निश्चित झाल्यानंतर त्यातून माघार न घेता आत्मविश्वासाने व परिश्रमाने त्या करिअरमध्ये समर्पित भावनेने कार्य करावे. आपले वर्धमान कर्तुत्व समाज व राष्ट्राच्या चरणी समर्पित व्हावे असे प्रतिपादित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य संयोजक व मानव संसाधन, पुणे येथील संचालक सूर्यकांत मुळे यांनी केले. निलंगा तालुक्यातील भूमिपुत्र या नात्याने मला माझ्या पंचक्रोशीतील विद्यार्थी,पालक व शेतकऱ्यांची सेवा करायची आहे, याही पुढे अनेक सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करून ग्रामोद्धार करण्याचे माझे स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले.

करिअर मार्गदर्शन कार्यक्रमासाठी विविध शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व परिसरातील चार शाळेतील इयत्ता नववी व दहावीच्या २४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार स्वामी हे उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांनी आशीर्वचन दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन तांबाळा येथील श्री षण्मुखेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक उडबळे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाहू गुरुजी, वलांडे गुरुजी, संस्थेचे अध्यक्ष श्री इंडे गुरुजी, उपाध्यक्ष श्री दरेकर सर, सचिव श्री पृथ्वीराज मुळे यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या उपाध्यक्षपदी डॉ. एस. एम. जोगदंड तर सहसचिवपदी डॉ. डी. एन. मोरे यांची निवड



लातूर / प्रतिनिधी- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाशी संलग्नित महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (एमफुक्टो)ची सर्वसाधारण सभा पार पडली. त्यामध्ये २०२४ ते २०२६साठी राज्य कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये एम्फुक्टोशी संलग्नित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स असोसिएशन स्वामुक्टा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सूर्यकांत जोगदंड यांची उपाध्यक्षपदी तर पीपल्स कॉलेज, नांदेड येथील डॉ. डी. एन. मोरे यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. एस. पी. लवांदे व सचिवपदी डॉ. प्रवीण रघुवंशी यांची पुर्ननिवड करण्यात आली. तसेच डॉ. दिलीप पाईकराव, डॉ. विजय भोपाळे व डॉ. अमोल लाटे यांची कार्यकारी समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली.

या बैठकीत दि. १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसुचनेची जशास तशी अंमलबजावणी, एम.फील. व पीएच.डी. प्रोत्साहनपर वेतन वाढ, एम.फिल.धारक प्राध्यापकांना पदोन्नतीचे लाभ, सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मंत्रालयस्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात यावी, नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पूर्णवेळ प्राध्यापकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी व शिक्षण धोरणातील तृटी दूर करण्यात याव्यात आदी मागण्यांसाठी संघटनेने पुकारलेले राज्यव्यापी आंदोलन व त्याच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. संघटनेने पुकारलेले पाच टप्प्यातील आंदोलन यशस्वी करण्याचा निर्धार करण्यात आला. या बैठकीसाठी एमफुक्टोच्या सर्वसाधारण सभेचे सदस्य डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. रामचंद्र भिसे, डॉ. किशोर हुगे, डॉ. काशिनाथ चव्हाण व प्रा. बालाजी सूर्यवंशी इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या या निवडीबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड स्वामुक्टा लातूरचे अध्यक्ष डॉ. भास्कर रेड्डी, उपाध्यक्ष डॉ. विजयकुमार सोनी, सचिव डॉ. मनोहर चपळे, कोषाध्यक्ष प्रा. धोंडीबा भुरे आणि जिल्हा प्रतिनिधी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# कुमारावस्था म्हणजे स्वत:चे अस्तित्व शोधण्याचा काळ - नीता मोरे



**उदगीर (प्रतिनिधी)** स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळातील जयहिंद पब्लिक स्कूलमध्ये किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन संपन्न झाले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून मॅनेजर ज्योती स्वामी आणि मंचावर संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सुधीर जगताप, प्रिन्सिपल संजय हट्टे, व्हॉइस प्रिन्सिपल सतीश वाघमारे, नेट कॉर्डिनेटर मनोरमा शास्त्री, क्रीडा शिक्षक संदीप पवार हे मान्यवर उपस्थित होते.

समुपदेशन करताना नीता मोरे म्हणाल्या की, ङ्गवय वर्ष १३ ते १९ हा कुमारावस्थेचा काळ आहे. ही आयुष्यातील सर्वात महत्त्वाची अवस्था आहे. झपाट्याने शारीरिक बदल, नवीन मित्र, लहरी स्वभाव, भावनिक अस्थिरता ही काही वैशिष्ट्ये आहेत. स्व ची जाणीव, चिकित्सक विचार, स्वनिर्णय क्षमतेची रुजवण यावेळी होत असते. विद्यार्थ्यांनी स्वतःतील बलस्थाने, कमतरता, संधी आव्हाने ओळखून प्रत्येक गोष्ट करावी.ङ्ख असे सांगून आहार, राहणीमान, शिस्त याविषयी चर्चात्मक माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात ज्योती स्वामी यांनी विद्यार्थ्यांनी संघर्ष व कष्टाची तयारी ठेवावी असे सांगितले.

सूत्रसंचालन व आभार सतीश वाघमारे यांनी केले तर ज्योती स्वामी यांनी स्वागत व परिचय दिला.

# लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन साजरा



**उदगीर (प्रतिनिधी)** गाडगे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी विद्यालयांमध्ये स्वयंशासन दिन अतिशय उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. एक दिवस संपूर्ण शाळा चालविण्याची जबाबदारी इयत्ता दहावी वर्गातील विद्यार्थ्यांना सोपविण्यात आली. या मागचा हेतू असा होता की विद्यार्थ्यांना अध्यापन करीत असताना शिक्षकांविषयी चे खूप आकर्षण असते व आदर असतो आपणही एक दिवस शिक्षक व्हावे, अशी विद्यार्थ्यांची इच्छा असते पण भविष्यामध्ये ही संधी प्रत्येक विद्यार्थ्याला मिळेलच असे नाही. याची जाणीव ठेवून लालबहादुर विद्यालयाने अतिशय उत्साहाने स्वयंशासन दिन साजरा केला. यामध्ये प्रथम सत्रामध्ये शाळेतून गुणानुक्रमे प्रथम आलेला विद्यार्थी संकेत कमलापूरेला मुख्याध्यापक होण्याचा मान देण्यात आला तर सर्वद्वितीय आलेले श्रद्धा कुलकर्णी व बालाजी पाटील यांनी उपमुख्याध्यापक पदाचे दायित्व सांभाळले. पर्यवेक्षक पदी कुणाल पाटील, पार्थ केंद्रे, संध्या मदने, वैष्णवी वीरकपाळे यांनी कामकाज हाताळले.

परीक्षा विभाग निष्ठा भांगे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख मधूरा तेलंगे, क्रीडा शिक्षक सुयश देशपांडे, भागवत जाधव, शालेय पोषण आहार विनोद मुसने या विद्यार्थ्यांनी कुशलतेने व उत्साहाने आपापले विभाग हाताळले. या स्वयंशासन दिन उपक्रमात एकूण २०० विद्यार्थी शिक्षकांनी अध्यापन कार्य केले. सेवक म्हणून प्रेम सूर्यवंशी व त्यांच्या सहकारी मित्रांनी उत्तम कार्य केले. स्वयंशासन दिन उपक्रमाचे यशस्वी नियोजन दहावी प्रमुख रामेश्वर मालशेट्टे व सहप्रमुख लक्ष्मी चव्हाण यांनी केले.

समारोप प्रसंगी अध्यक्षस्थानी विराजीत असलेले संकुलाचे अध्यक्ष मधूकर वट्टमवार यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले . यावेळी विद्यार्थी मुख्याध्यापक संकेत कमलापुरे, विद्यार्थी उपमुख्याध्यापक बालाजी पाटील, विद्यार्थी शिक्षक श्रद्धा उप्पे व शार्दूल साबणे यांनी अनुभव कथन केले. शिक्षक निरीक्षक अनिता यलमटे व निता मोरे यांनी दिवसभराचे विविध अनुभव सांगितले .

समारोप प्रसंगी संकुलाचे कार्यवाह शंकरराव लासूणे, मुख्याध्यापक अंबादास गायकवाड, उपमुख्याध्यापक संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, लालासाहेब गुळभिले माधव मठवाले, दहावी प्रमुख रामेश्वर मलशेट्टे मंचावर उपस्थित होते.

समारोप सत्राचे सूत्रसंचालन मधूरा तेलंगे, प्रास्ताविक श्रीकृष्ण धनगे, स्वागत परिचय भूमी सुडे, आभार जनक बिरादार व वैयक्तिक गीत ॠतूजा पांचाळ, कल्याण मंत्र निष्ठा भांगे हीने गायले.

## उदगीर नगर परिषद कार्यालय, जिल्हा लातूर

उनप/ई-निविदा/सार्वजनिक बांधकाम विभाग/ /२०२४ दिनांक २२/०२/२०२४

### ई-निविदा सूचना (तिसरी वेळ)

मुख्याधिकारी नगर परिषद उदगीर हे वैशिष्टयपुर्ण योजने अंतर्गत शहरातील वैशिष्टयपुर्ण योजने अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे यांना पुर्णाकृती पुतळा उभारण्याच्या कामासाठी इच्छुक नोंदणीकृत शिल्पकार यांचे कडून दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागवीत आहेत. निविदे बाबतच्या अटी व शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद केलेले असून निविदा फॉर्म विक्री व प्रक्रिये बाबतचा काम निहाय स्वतंत्रा तपशील http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर निविदा दिनांक २६/०२/२०२४ ते दिनांक ०४/०३/२०२४ पर्यंत ऑनलाईन पाहता व भरता येतील.

मुख्याधिकारी
नगर परिषद उदगीर










## उदगीर मनोरंजन

**कल्पना** 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो





## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
| --- | --- | --- | --- |

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
| --- | --- |

**मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय**

**भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स**

| | | |
| --- | --- | --- |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव


जा.क्र.२०२४/एमएजी/कावि

## जाहीरनामा

दि. २०/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार नामदेव बाबू नागरगोजे रा. देवूळवाडी ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०६/१९९१ रोजी मौजे देवूळवाडी ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार नामदेव बाबू नागरगोजे रा. देवूळवाडी ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०६/१९९१ रोजी मौजे देवूळवाडी ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०६/१९९१ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक १५/०६/१९९१ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामदेव बाबू नागरगोजे रा. देवूळवाडी ता.उदगीर यांचा जन्म दिनांक १५/०६/१९९१ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बोरगाव बु. येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०२/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख २१/०३/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ३५/२०२४ निशाणी क्र.०६

अर्जदार सागरबाई भ्र. बालाजी हुशोर ज्यापेक्षा पती नामे बालाजी कोंडीबा हुशारे हे दिनांक १७/०५/२०१७ रोजी मौजे वलांडी ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
| --- | --- | --- | --- |
| १) | सागरबाई भ्र. बालाजी हुशारे | ५५ | पत्नी |
| २) | विलास पि. बालाजी हुशारे | ३० | मुलगा |
| ३) | वैभव पि. बालाजी हुशारे | २५ | मुलगा |
| ४) | कोमल पि. बालाजी हुशारे | २३ | मुलगी |
| ५) | हर्षली प्रशांत खैरमोडे | ३२ | मुलगी |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०४/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
### मा.एन.जे. चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३२/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Ashok S/o. Ramrao Demgunde हे दिनांक १३.०१.२०२४ रोजी At. Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Savita W/o. Ashok Demgunde, Age 47, Occu- H.H.
2) Akshay S/o. Ashok Demgunde, Age 25, Occu- Education .
3) Jaykant S/o. Ashok Demgunde, Age 21, Occu- Education.
4) Anusaya W/o. Ramrao Demgunde, Age 70, Occu- H.H.
All R/o. Gudsur, Tq.Udgir, Dist.Latur
यांनी खालील नमूद हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
| --- | --- | --- | --- |
| 1) | Savita W/o. Ashok Demgunde | 47 | Wife |
| 2) | Akshay S/o. Ashok Demgunde | 25 | Son |
| 3) | Jaykant S/o. Ashok Demgunde | 21 | Son |
| 4) | Anusaya W/o. Ramrao Demgunde | 70 | Mothter |

अर्जदार याने Ashok S/o. Ramrao Demgunde या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Ashok S/o. Ramrao Demgunde यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः २३/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ३०/०३/२०२४

आदेशावरुन

(ए.आर. गायकवाड) कनिष्ठ लिपिक, ३ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर — (एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## जाहिरनामा
### दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ०८/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार संजीवनी भ्र. सुनिल इंचुरे ज्यापेक्षा पती नामे सुनिल दत्तात्रय इंचुरे हे दिनांक २९/०१/२०२३ रोजी लासोना ता.देवणी जि.लातूर येथे मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
| --- | --- | --- | --- |
| १) | संजीवनी भ्र. सुनिल इंचुरे | २४ | पत्नी |
| २) | सृष्टी पि. सुनिल इंचुरे | ०१ | मुलगी |
| ३) | बबीता भ्र. दत्तात्रय इंचुरे | ४८ | आई |

यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २४/०१/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २६/०२/२०२४

आदेशावरुन

(आर.टी.शिंदे) व.लिपिक — शिक्का — (पी.एम. नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा
### मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०१/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Rukminbai W/o. Venkat Dumne हे R/o Manggrul Tq.Jalkot Dist.Latur दिनांक १९/०४/२०२१ रोजी At. Manggrul Tq.Jalkot Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Venkat S/o. Maroti Dumne, Age 75, Occu- Agri.
2) Omkar S/o. Venkat Dumne, Age 22, Occu- Education
Both R/o. Manggrul Tq.Jalkot Dist.Latur
यांनी खालील नमूद २ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
| --- | --- | --- | --- |
| 1) | Venkat S/o. Maroti Dumne | 75 | Husband |
| 2) | Omkar S/o. Venkat Dumne | 22 | Son |

अर्जदार याने Rukminbai W/o. Venkat Dumne या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Rukminbai W/o. Venkat Dumne यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः २६/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २८/०३/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक, २ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर — (एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

**PROCLAMATION**

(NOTICE FOR APPEARANCE OF RESPONDENT NO. 1) IN THE COURT OF THE SENIOR CIVIL JUDGE AND JMFC AT BHALKI
M.V.C. No: 169/2022
The Claimant-
**Shakuntala**
The Respondent
**Versus**
Govind (died by his LRs) & Others
**Subject:** Claim petition U/s 166 of I.M.V. Act. 1988.
To,
1. LR (a) Respondent No(1)-
Ratnabai W/O Ramkrishna,
Ingle, Age: 55 years, Occ: House Hold, R/O Village Jodwadi, Tq: Ambejogai. Dist: Beed (M.S), now at Sambajinagar Warwatti, Kalam Road Latur Dist: Latur (MS)
Whereas the claimant has filed claim petition against the respondent No. 1 and 2. During the pendency of claim petition the respondent No. 1 died.
The Court has issued the notices to the LR of respondent No. 1 to appear before this court, the same Notices are returned un-served. It appear you are avoiding to receive the same, and hence the claimant is constrained to get publish the same in the daily new paper circulated in the jurisdiction where the LR of respondent No. 1 is residing.
You are hereby directed to appear this Court on 01-04-2023 at 11 A.M. in person or through your counsel. If you failed to appear before the court on the above said date and time. The case will be heard and determined in your absence as per Law.
Given under my hand and seal of the court on this the 17/02/2024 day of
//By Order of Court//

**[Sri Subhash Sirke]**
Sheristedar/Chief Ministerial Officer, Senior Civil Judge and Addi MACT at Bhalki

Chief Ministerial Officer
**Senior Civil Judge & JMFC Court, BHALKI**

**DECLARATION**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER-PATHAN SHAFIULLAHKHAN MUNWARKHAN
TO: SHAFIULLA KHAN MUNWAR KHAN PATHAN HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SHAFIULLA KHAN MUNWAR KHAN PATHAN IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE
**OLD NAME -**PATHAN SHAFIULLAHKHAN MUNWARKHAN
**NEW NAME-**SHAFIULLA KHAN MUNWAR KHAN PATHAN
**ADDRESS**
KATGAR GALLI BACKSIDE POLICE STATION
AUSA DIST LATUR 413520

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
NEHA DILIP TEKALE TO NEHA OMPRAKASH BHUTE
HENCE FOR THIS DECLERETION
IN FUTURE I WILL USE THIS NAME NEHA OMPRAKASH BHUTE THE SAME NAME WILL BE USED BY MY HUSBAND / WIFE AND CHILDREN
**OLD NAME:** NEHA DILIP TEKALE
**NEW NAME:** NEHA OMPRAKASH BHUTE
**ADRESS**
NANDED ROAD GAWALI NAGAR,VIVEKANAND CHOWK, LATUR, MAHARASHTRA 41351


# सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.
१००% चान्स पास होणार

## गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

कल्याणम

### मिलनम डे

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ४-७ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे
99 75 47 98 26





पान १ वरून

### देशाला...

लाखो शेतक-यांना रोजगार
मी असे म्हणू शकतो की, गेल्या १० वर्षात आपण जे काही प्रयत्न केले, ते खादी हे विकास आणि रोजगार या दोन्हीचे साधन बनले आहे. आज भारत जगातील कापूस, ताग आणि रेशीम उत्पादक देशांपैकी एक आहे. लाखो शेतकरी या कामात गुंतले आहेत. आज सरकार लाखो कापूस उत्पादक शेतक-यांना आधार देत आहे, त्यांच्याकडून लाखो क्विंटल कापूस खरेदी करत आहे. सरकारने सुरू केलेला कस्तुरी कापूस भारताची स्वत:ची ओळख निर्माण करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार आहे. देशाला ग्लोबल हब बनवू असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### राम मंदिरातील...

येणा-या भाविकांचा उत्साह प्रचंड आहे. गर्दी कमी झाल्यावर मग रामदर्शनासाठी जाऊ, अशी वाट भाविक पाहताना दिसत नाहीत. रामलला दर्शन घेण्यासाठी देश-विदेशातून भाविक येत आ-हेत. सर्वांना रामदर्शनाची उत्सुकता आहे. अयोध्येतील राम मंदिर इतर मंदिरांच्या तुलनेत कसे आहे, हे पाहण्यासाठीही लोक दर्शनासाठी येत आहेत, असे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामलला प्राणप्रतिष्ठापना सोहळा झाल्यापासून एका महिन्यात १०० कोटींपेक्षा अधिकचे दान प्राप्त झाले आहे. भाविकांनी धनादेश किंवा पावतीद्वारे श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टला अर्पण केलेले हे दान आहे. तर, दानपेटी आणि ऑनलाइन बँक खात्यावर पाठवलेली रक्कम वेगळी आहे. त्याची माहिती बँकेमार्फत दिली जाणार आहे. भारतीय स्टेट बँकेच्या अयोध्या शाखेच्या व्यवस्थापकांनी याबाबत अधिक माहिती देण्यास नकार दिला. श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष महंत गोविंद देवगिरी महाराज यांनी याबाबत सांगितले की १९ जानेवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत ५० कोटींहून अधिक रुपये भाविकांनी दान-देणग्या दिल्या आहेत. अलीकडेच जमशेदपूर, झारखंड येथील एका कंपनीने रामललाला ११ कोटी रुपये अर्पण केले.

### एआय...

सुविधा देण्यासाठी एआय उपयुक्त ठरू शकते.

पुढील २० वर्षे महत्वाची

डॉ. शैलेश कुमार: मुख्य डेटा वैज्ञानिक, रिलायन्स जिओ रिलायन्स जिओचे चीफ डेटा सायंटिस्ट डॉ. शैलेश कुमार म्हणाले की, गेल्या वीस वर्षांत तंत्रज्ञान खूप विकसित झाले आहे, ज्यामध्ये चॅटजीपीटी महत्त्वाचा आहे. अशा परिस्थितीत पुढील २० वर्षे खूप महत्त्वाची आहेत. कृषी, आरोग्य क्षेत्र आणि इतर क्षेत्रातील विकासासाठी एआय तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल. एआयसह, तुम्ही घरबसल्या त्याच्या लक्षणांवर आधारित रोग ओळखू शकता. याशिवाय आता एआय ट्युटर, एआय डॉक्टर, एआय टेक्निशियन घरबसल्या सहज उपलब्ध आहेत.

भारतात योग्य डेटा नाही

भारतात सध्या योग्य एआय डेटा नाही, कारण बरेच लोक चुकीच्या आयडीने त्याचा वापर करत आहेत. त्यामुळे तुमचे वागणे नीट समजत नाही आणि तुमची समस्या सोडवू शकत नाही. रिलायन्सकडे चांगले डेटा सेंटर आहे कारण डेटा सुरक्षा ही मोठी जबाबदारी आहे. जोनाथन ब्रॉन्फमन म्हणाले की एआयने सामग्रीच्या सीमा काढून टाकल्या आहेत. रेस या हॉलिवूड चित्रपटात एआयचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे. जोरा चित्रपटात जागा निर्माण करण्यासाठी एआयचा वापर करण्यात आला होता. प्रआयने चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीत नवीन मार्ग उघडले आहेत.

### मराठवाड्यातील...

उठवल्यानंतर पुन्हा मुंबईकडे सागर बंगल्यावर जाणार असल्याचे मनोज जरांगेंनी सांगितले.

### फसवणूक...

हा संवाद काही काळ जोडला गेला पण तो पुन्हा जोडला जाऊ शकतो. तापमानात सुधारणा होताच ते पुन्हा अचूकपणे काम करू शकते. जपानी स्पेस एजन्सीला आशा आहे की स्लिम मून प्रोब पुन्हा काम करेल. जेएएक्सएने ट्विट केले की स्लिमशी संपर्क काही वेळाने तुटला. पण चंद्रावर अजून दुपार आहे. संप्रेषण उपकरणांचे तापमान खूप जास्त आहे. तापमान कमी होताच आम्ही त्याच्याशी पुन्हा संपर्क साधण्याचा प्रयत्न करू असेही ट्विटमध्ये म्हटले आहे.

चांद्रयान ३ पुर्नजिवीत झाले नाही

जपानचे स्लिम लँडर लक्ष्य लँडिंग साइटपासून फक्त १८० फूट त्रिज्येमध्ये चंद्रावर उतरले होते. हे ठिकाण चंद्राच्या विषुववृत्ताच्या दक्षिणेला होते. यावेळी थोडा गोंधळ झाला होता. सौर पॅनेल सूर्याच्या विरुद्ध दिशेने होते. यानंतर आठवडाभरानंतर सूर्यप्रकाश पडला तेव्हा स्लिम ॲक्टिव्ह झाला. १ फेब्रुवारी मध्ये २०२४, सडपातळ लँडर पुन्हा हायबरनेशनमध्ये जाईल. म्हणजेच, तो चंद्राच्या लांब हिवाळ्याच्या रात्री झोपला. पण आता तो पुन्हा ॲक्टिव्ह झाला आहे. पण इस्रोचे चांद्रयान-३ हे करू शकले नाही. २३ ऑगस्ट २०२३ रोजी लँडिंग केल्यानंतर, चांद्रयान-३ मिशनने आठवडाभर काम केले.

### फसवणूक...

विधान सभा आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आणि महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवनाच्या पाय-यांवर जोरदार निदर्शने केले. यावेळी काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते बाळासाहेच थोरात, नितीन राऊत, अमीन पटेल, अमित देशमुख,धीरज देशमुख,जितेश अंतापुरकर ,भाई जगताप, राजेश राठोड शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विधिमंडळ गटनेते अजय चौधरी,राजन साळवी, नरेंद्र दराडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गटाचे) अनिल देशमुख, सुनील भुसारा , विनोद निकोले यांच्या उपस्थितीत विरोधी पक्षाच्या आमदारांनी मराठा आणि ओबीसी समाजाची आरक्षणाच्या मुद्द्यावर फसवणूक करणा-या सरकारविरोधात घोषणा लिहिलेले फलक घेत जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

### अहमदपूर...

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सखी मतदान केंद्र, दिव्यांग मतदान केंद्र, आदर्श मतदान केंद्र स्थापन करण्याबाबत नियोजन करावे. भरारी पथके आणि इतर पथके स्थापन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. टपाल मतपत्रिका, वाहतूक आराखडा, भरारी पथके, स्थायी पथके, चेक पोस्ट आदी अनुषंगाने करण्यात आलेल्या तयारीचा त्यांनी यावेळी आढावा घेतला.

### संवेदनशील...

पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळाचे प्रशिक्षण, साधन सामग्री सज्ज ठेवावी. भरारी पथके, स्थायी पथके याकरिता पुरेशा प्रमाणात अधिकारी, कर्मचारी नियुक्त करावेत. निवडणूक विषयक कामामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये, याची खबरदारी घेण्याच्या सूचना जिलाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केल्या.

**CHANGE OF NAME**

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : SAIYYAD SHAHEEN RASHID
TO : SAYYED SHAHEEN RASHID HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE
KNOWN BY THIS NAME AND WILL USE SAYYED SHAHEEN RASHID IN
FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE,
CHILDREN AND RELATIVE
**OLD NAME:** SAIYYAD SHAHEEN RASHID
**NEW NAME:** SAYYED SHAHEEN RASHID
**ADDRESS**
52AMBEDKAR NAGAR HOTGI ROAD MAJREWADI
SOLAPUR TQ DISTRICT SOLAPUR 413003

**सुर्यामाई फंक्शन हॉल**
सर्व सोयींनी युक्त
बुकिंग चालू आहे
आयटीआय कॉलेज समोर, देगलूर रोड, उदगीर जि.लातूर
संपर्क - ९७६५८४३००८
पॅकेज : रु ४००००/-





# यशवंत उदगीर

मंगळवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२४

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# २०२४ ची निवडणुक लोकशाहीची परिक्षा घेणारी

## निर्भयपणे मतदान करुन भाजपा सरकारला घालवा- निखील वाघळे



**उदगीर (प्रतिनिधी)** पत्रकार हा कायमचा विरोधी पक्ष असतो त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या चुका दाखविण्याचे त्याचे काम आहे. सर्व बाजुने अपयशी ठरलेल्या मोदी सरकारला घालविणे हे पहिले काम आहे. असे प्रतिपादन निर्भय बनो आंदोलनाचे प्रनेते निखील वाघळे यांनी केले.

उदगीर नगर परिषदेच्या व्यापारी संकुल समोरील प्रांगणात जेष्ठ पत्रकार निखील वाघळे यांची निर्भय बनो जाहिर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यापीठावर जेष्ठ विचारवंत सोमनाथ रोडे, नितीन वैद्य, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, डॉ. अंजुम कादरी, शिलाताई पाटील, डॉ. ज्योती सोमवंशी आदि उपस्थित होते. प्रारंभी निखील वाघळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन व मशाल पेटवुन उद्घाटन झाले. यावेळी संयोजक अजीत शिंदे यांनी प्रास्ताविकात निर्भय बनो जेष्ठ पत्रकार निखील वाघळे यांची जाहीर सभा घेण्यामागील भूमिका विषद केली.

यावेळी बोलताना निखील वाघळे म्हणाले की, २०२४ ची निवडणुक ही लोकशाहीची खऱ्या अर्थाने परिक्षा घेणारी असुन या परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी मोदी सरकारला पराभुत करुन महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन निखील वाघळे यांनी पुढे बोलताना केले. जगातील हुकूमशाहीचा व हुकूमशाहांचा अभ्यास केला तर मोदी त्याच रांगेत बसणारे आहेत. मागच्या १० वर्षात काय चांगले झाले असा प्रश्न निखील वाघळे यांनी उपस्थित केलो. देशात धर्मवाद, जातवाद वाढविण्याचे काम मोदी, शहांनी केले असुन देशाला हुकूमशाहीपासुन वाचवायचे असेल तर त्यांना सत्तेतुन हटवायलाच हवेत असे निखील वाघळे पुढे बोलताना म्हणाले. एकही पत्रकार परिषद न घेणारे मोदी चौथ्यास्तंभाला बोलतही नाहीत त्यामुळे त्यांना धडा शिकविणे हे काम लोकांचे आहे असे वाघळे पुढे बोलताना म्हणाले.

उदगीर ही पुरोगामी विचाराची नगरी असुन परिवर्तनाची मशाल उदगीर येथुन पेटलेली आहे व ती महाराष्ट्रभर फिरणार आहे. येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकी महत्वाच्या असुन मन की बात चालणार की जन की बात चालणार हे महत्वाचे आहे. या निवडणुकीत गद्दारांना त्यांची जागा दाखवुन द्या. भाजपा हा राजकारण्यांची घरे फोडणारा पक्ष असुन सत्ता मिळविण्यासाठी ते कोणत्याही टोकाला जाते. महायुतीचे सरकार म्हणजे चोर आणि दरोडेखोरांचे सरकार आहे. मोदी आणि शहा यांचा पराभव करु शकणारा उमेदवार हा महाविकास आघाडीचा असावा. प्रकाश आंबेडकरांची वंचित आघाडीबरोबर राहिले पाहिजे. निवडणुकीनंतर अजित पवार आणि एकनाथ शिंदे अडगळीला पडतील. सध्या राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले असुन शिवरायांचा महाराष्ट्र वाचवायचा असेल तर प्रत्येक घरात माणसे निर्भय झाली पाहिजेत. देशात एक प्रकरची अघोषित आणीबाणी सुरु झाली आहे. त्यासाठी जागे व्हा कोणत्याही अतिषाला बळी पडू नका. जो नागरीक प्रलोभनाला बळी पडतो तो संविधानाचा आपमान करतो. धर्माच्या नावावर या देशाची फाळणी करायची नसेल तर भाजपाला सत्तेतून खाली खेचा असे आवाहन निखील वाघळे यांनी केले. यावेळी सोमनाथ रोड, नितीन वैद्य याची भाषणे झाली.

कार्यक्रमास परिसर गर्दीने फुलून गेला होता.


### भाजपा युवा मोर्चाची घोषणाबाजी

निखील वाघळे यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा व भाजपा सरकारवर टिका केली. त्यांचे भाषण संपताच भाजपा कार्यालयाच्या बाहेर थांबलेल्या भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे यांच्या नेतृत्वाखाली युवा कार्यकर्त्यांनी मोदी... मोदी... म्हणून घोषणाबाजी केल्याने एकच गोंधळ उडाला त्या घोषणाबाजीला प्रत्युत्तर देत उपस्थित संयोजक कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.



**उदगीर :** माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे यांचे सुपूत्र प्रसाद निटुरे यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांनी उदगीर दौऱ्यात आले असता निवासस्थानी भेट देवून माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे परिवाराचे सांत्वन केले. यावेळी विजयकुमार निटुरे, आर.पी.आय.चे देविदास कांबळे, श्रीरंग कांबळे, सुभाष धनुरे, राजकुमार बिरादार यांच्यासह आर.पी.आयचे पदाधिकारी उपस्थित होते.

# उदागिर बाबाच्या मंदिराचे जनत व दुरुस्तीसाठी १० कोटी ९६ लाख २३ हजार ४८६ रुपयाचा निधी मंजुर -ना. संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर येथील ऐतिहासिक उदागिर किल्ल्यातील उदागिर बाबाच्या मंदिराचे जनत व दुरस्तीच्या कामासाठी १०,९६,२३,४८३ रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सध्या महाराष्ट्र सरकाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार दि. २३,२४ च्या अर्थसंकल्पामध्ये अर्थ वित्तमंत्री अजित पवार यांनी शिवकालीन किल्ल्याच्या संवर्धनाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा केलेली आहे. त्यानुसार शिवकालीन किल्ल्याचे संवर्धन व जनत अंतर्गत उदयगिरी किल्ला येथील उदागिर बाबा मंदिराचे जतन व दुरुस्ती करिता १०,९६,२३,४८३ रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उदागिरी किल्लयातील उदागिर बाबा मंदिराच्या जतन व दुरुस्तीसाठी भरघोस निधीस प्रशासकीय मान्यता मिळवुन घेतल्याबद्दल राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांचे भक्तांकडून अभिनंदन होत आहे.

# जळकोट प्रशालेतील चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने .. !

**जळकोट (माधव होनराव)** येथील जि. प. प्रशाला येथे वार्षिक स्नेहसंमेलन ता. २३ फ्रेब्रूवारी रोजी उत्साहात पार पडले. बाल कलाकारांनी गीत व नृत्याचा अविष्कार दाखवत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकरआप्पा धुळशेट्टे होते तर उद्घाटक म्हणून जळकोट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काकडे हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा प्रभावती कांबळे , उपनगराध्यक्ष मन्मथआप्पा किडे , गटनेते ॲड. तात्या पाटील, नगरसेवक विनायक डांगे, शिवलिंग धुळशेट्टे , खादरभाई लाटवाले, सुरेखा गवळे, केंद्रप्रमुख माधव देमगुंडे, शाळेचे मुख्याध्यापक पंढरीनाथ टेकले, प्राचार्य दत्तात्रय हम्पल्ले, चंद्रशेखर कळसे यांच्यासह माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका मोमीन मॅडम यांच्यासह शिक्षकांनी परिश्रम घेतले सूत्रसंचालन आशोक चापटे यांनी केले तर आभार शंकरआप्पा धूळशेटे यांनी मानले.




# रुग्णांना चष्मे व फळे वाटून रोटरी स्थापना दिवस साजरा



**जळकोट (प्रतिनिधी)** जागतिक रोटरी दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ्फ उदगीर सेंट्रल तर्फ्रे उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयातील रुग्णांना चष्मे व फ्रळे वाटप करण्यात आली.

दि. २३ फ्रेब्रुवारी हा दिवस रोटरी इंटरनॅशनल स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो. रोटरी इंटरनॅशनल ही एक सामाजिक सेवाभावी संस्था मागील ११९ वर्षापासून जगभरात सामाजिक सेवांच्या माध्यमातून कार्य करत आहे. उदगीर रोटरी क्लबने हा ११९ वा वर्धापनदिन उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय येथे रुग्णांना चष्मे व फ्रळे वाटप करून साजरा केला. तसेच अरुणा अभय ओसवाल अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत केक कापून व विद्यार्थ्यांना फ्रळे व बिस्किट्स वाटप करून रोटरी डे साजरा केला. यावेळी उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया, रोटरी क्लब उदगीर सेंट्रलच्या अध्यक्षा मंगला विश्वनाथे, सचिव सरस्वती चौधरी सह विशाल जैन, ज्योती चौधरी, संतोष फ्रुलारी, विशाल तोंडचिरकर, डॉ. सुधीर जाधव, रविंद्र हसरगुंडे, विजयकुमार पारसेवार, चंद्रकांत ममदापुरे, अभिजित पटवारी आदी सदस्यांची उपस्थिती होती.


**दुकान भाडयाने देणे आहे**
शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर
१८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.
संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८


# शालेय शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक सभापतीपदी डॉ. वर्षा सिध्देश्वरे



**जळकोट (प्रतिनिधी)** नगरपंचायतीच्या विविध विषय समितीच्या निवडी नगरपंचायतीच्या सभागृहात उदगीरचे उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे यांच्या उपस्थित पार पडल्या. त्यामध्ये डॉ. वर्षा सचिन सचिन सिध्देश्वरे यांची निवड शालेय शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक सभापतीपदी करण्यात आली. यावेळी त्यांचा शाल,श्रीफ्रळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष प्रभावती कांबळे,उपनगराध्यक्ष मन्मथ किडे, अँड.तात्या पाटील, मुख्याधिकारी बोदर आदिसह सर्व नगरसेवक उपस्थित होते. नुतन सभापती डॉ. वर्षा सिध्देश्वरे यांचे क्रिडामंत्री संजय बनसोडे , विकास परिषदेचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**


**Niture AGRO TOURISM**
निटुरे कृषी पर्यटन, उदगीर
श्री.राजराजेश्वरी मंदीरच्या समोर..

एक दिवसीय ट्रिप साठी गार्डन प्रवेश शुल्क 550रु
प्रति व्यक्ती असेल वेळ सकाळी 10:30 ते सायंकाळी 5:30
या मध्ये आपणास खालील सुविधा मिळतील.

चला एकदिवस निसर्गाच्या सानिध्यात

१) सकाळी नाष्टा व चहा किंवा ज्युस
२)दुपारचे जेवण पोट भरुन
३)सायंकाळी चहा/भजे किंवा बिस्कीट
मधल्या वेळेस आपणास मनोरंजना साठी विविध प्रकार चे खेळ कॅरम,चेस क्रिकेट,वॉलीबाल झोका,पाळणा,वाचणयास पुस्तके,रेन डॉन्स, आराम करण्यास बाज,टेंट,आटोळा तेसच बास्केटबॉल,टेनिस बॉल लहाण मुलासाठी बंदुक शॉट रिंगा,बदक,घसरगुंडी,पाळणा,सायकल गाडी बैलगाडी,ट्रॅक्टर फेरी इतर भरपूर,मंदिर दर्शन सेल्फी पॉइंट इत्यादी.

फक्त गार्डन पाहाण्यास 200रु प्रतिव्यक्ती शुल्क आकारल जाईल यामध्ये आपणास नाष्टा व चहा दिला जाईल
3 तासाचा अवधी दिला जाईल

फोटोशुट 1000रु
व्हिडियो करणेसाठी 3000रु
दर आकारला जाईल
35000/- मध्ये सर्व साहित्यासहीत मंगल कार्यालयाची बुकींग चालु आहे.

१)तसेच फॅमिली सहल(एक दिवसीय) २)शाळेची सहल (एक दिवसीय)
३)बर्थडे पार्टी (एक दिवसीय) ४)गेट टुगेदर (एक दिवसीय)
५)कॉलेज सहल (एक दिवसीय) ६)एगेजमेंट पार्टी (एक दिवसीय)
७)लग्नाची पार्टी (एक दिवसीय) ८)लग्नवाढदिवसाची पार्टी (एक दिवसीय)
९)किट्टी पार्टी (एक दिवसीय)
एक दिवस अगोदर बुकिंग करणे अवश्यक आहे.
संपर्क
श्री.राजराजेश्वरी नगर, राजराजेश्वरी मंदीरच्या समोर, मल्लापूर (देगलूर रोड), उदगीर जि.लातूर